गुरुवार, ४ मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२३८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 4 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-238 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




## पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार, राज्यातील रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण आणि वेगाने होण्याकरता राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. मुंबईत ४०० किमीच्या रस्त्यांचे काम सुरू आहे. तर, अनेक ठिकाणीही कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांवर देखरेख ठेवण्याकरता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आज मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण आणि वेगाने होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या महाडमंळाच्या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, काल ( २ मे ) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाची २० वी बैठक झाली. राज्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यात येत असल्याने राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्र व संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वाघासह वन्यप्राण्यांची वाढ झाली आहे. भारतीय व्याघ्र प्रगणना २०२२ साठी करण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये वाघांची संख्या ३१२ वरून ३९० झाली आहे. व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापन प्रभावी मूल्यांकनात पेंच व्याघ्र प्रकल्प देशातील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये आहे. त्याबद्दल राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**इतर कोणते निर्णय? :** कांदळवन व सागरी जैवविविधता या विषयात परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती . दरवर्षी २५ मुला-मुलींना शिष्यवृत्ती . घनकचरा संकलनासाठी आयसीटी आधारित प्रकल्प राबविणार . महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतून १०० टक्के अर्थसहाय्य . सर्व शहरांमध्ये हा प्रकल्प राबविणार . शिरोळ तालुक्यात ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय उभारणार . करमणूक शुल्क आकारणीमध्ये सुट देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला आहे .

# पुतिन यांच्या घरावर ड्रोन हल्ला

## जशास तसे उत्तर देण्याचा रशियाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : युक्रेनने थेट रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांच्या घरावर ड्रोन हल्ला केला आहे. या हल्ल्यामुळे रशियाने संताप व्यक्त केला असून युक्रेनला जशास तसे उत्तर देणार असल्याचे सांगितले. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांना दहशतवाद्यांप्रमाणे मारण्यासाठी युक्रेनने ड्रोन पाठवले, असा आरोप रशियन सरकारकडून करण्यात आला आहे. याची युक्रेनला मोठी किंमत त्याला मोजावी लागणार असल्याचा इशाराही रशियाने दिला आहे.**



रशियाचे 'पॉवर हाऊस' समजल्या जाणाऱ्या क्रेमलिनने बुधवार, 3 मे रोजीच्या एका निवेदनात म्हटले आहे, युक्रेनने आज ड्रोनने क्रेमलिनवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, त्याचे कृत्य म्हणजे दहशतवादी हल्ला आहे. आम्हाला स्वतःचा बचाव करणे आवश्यक आहे. रशिया त्याला जशास तसेउत्तर देईल. क्रेमलिनच्या म्हणण्यानुसार, रशियन सैन्याने युक्रेनने सोडलेले दोन ड्रोन पाडले आहेत. हे ड्रोन रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यावर हल्ला करण्यासाठी आले होते. अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देश युक्रेनला घातक शस्त्रे पुरवत असल्याचा रशियन सरकारचा आरोप आहे. युक्रेनला आतापर्यंत अब्जावधी डॉलर्सच्या छोट्या-मोठ्या शस्त्रास्त्रांची रसद मिळाली आहे. त्याच्याकडे अत्याधुनिक ड्रोनचा ताफाही असल्याचे सांगण्यात येत आहे.

# समितीचा जो निर्णय होईल तो मला मान्य : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देताना मी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना आणि माझ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घ्यायला हवे होते, असे शरद पवारांनी म्हटले आहे. अध्यक्षपदासाठी जी समिती नेमली आहे त्यांनी 5 मे रोजी बैठक घ्यावी, त्यात जो काही निर्णय येईल तो आपल्याला मान्य असेल, असेही ते म्हणाले. राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर शरद पवारांची पहिलीच प्रतिक्रिया आली आहे.

शरद पवार म्हणाले की, मी वरीष्ठांना आणि माझ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले पाहिजे होते असे मला आता जाणवत आहे. जर मी हा निर्णय सर्वांना विचारून घेतला असता तर स्वाभाविकरित्या सर्वांनी मला विरोध केलाच असता. म्हणून मी हा निर्णय माझ्या मनाशी एकमत करून घेतला. पण आपण 6 मेची बैठक 5 मे रोजीच घ्या, समिती जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल. शरद पवार पुढे म्हणाले की, 1 मे1960 रोजी मी मी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली होती, त्यामुळे माझं 1 मे सोबत माझे वेगळे नाते आहे. मी युवक काँग्रेसच्या बैठकीत भाकरी फिरवण्याचे वक्तव्य केले होते. मी युवकांची मते विचारात घेणारा नेता आहे. त्यामुळे तुमच्या मतांचा मी आदर करतो. ग्रामीण भागातील युवक आणि युवतींना मुख्य प्रवाहात आणायचे आहे. राष्ट्रवादीचा नवा अध्यक्ष नेमण्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीची बैठक ही 6 मे रोजी होणार होती. पण आता शरद पवारांच्या निर्देशानुसार ती 5 मे रोजी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शरद पवार आपला निर्णय मागे घेणार का? किंवा राष्ट्रवादीला नवा अध्यक्ष मिळणार याचे उत्तर 5 मे रोजी मिळणार आहे.

# आता भाऊ-भावकीतील जमिनीचे वाद मिटणार?

## धाराशिव जिल्ह्यासाठी आलेल्या 21रोव्हर मशीनमुळे प्रलंबित असणाऱ्या मोजणी प्रकरणाला येणार गती

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

धाराशिव : जिल्ह्यातील मोजणी अचूक व गतिमान होण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयाकडून धाराशिव जिल्ह्यात 21 जमीन मोजणी यंत्रे (रोव्हर मशीन) आलेल्या आहेत. त्यामुळे आता तरी वर्षानुवर्ष प्रलंबित असणारी मोजणीची प्रकरणे वेगाने करून शेतकऱ्यांमधील बांधावरून होणारे वाद, खुणाच्या घटना, पोलीस, कोर्ट कचेरी ह्या सर्व गोष्टीमध्ये अडकलेल्या शेतकऱ्याचा विनाकारण वाया जाणारा वेळ अन् पैसा वाचण्यात मदत होईल असेच खात्री सध्यातरी शेतकऱ्यांमधून बाळगली जात आहे.

जमिनींच्या बांधांवरून होणारे वाद कायमचे मिटणार की, मागचीच उजळणी पुढे गिरवली जाणार, असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

महाराष्ट्राच्या भूमि अभिलेख विभागाकडून आता रोव्हर मशीनद्वारे एक क्षेत्राची मोजणी केवळ १०-१५ मिनिटांत होतें, असा भूमी अभिलेख विभागाचा दावा आहे. रोव्हर मशीनद्वारे मोजणी करून राज्यभरातल्या जमिनींची मोजणी केली जाणार आहे. जिल्ह्यात विविध असणाऱ्या मशीनमुळे उपग्रहाच्या आधारे प्राप्त होणाऱ्या तरंगलहरीद्वारे (सिग्नल) रोव्हर मशीनच्या माध्यमातून मिळणारे अक्षांश आणि रेखांश हे कायमस्वरूपी भूमी अभिलेख कार्यालयाकडे जतन होणार आहेत. या पद्धतीने होणाऱ्या मोजणीमुळे बांध खोदून जमीन बळकावण्याचे प्रकार कायमचे थांबणार असून, नैसर्गिक आपत्ती यात अति पावसामुळे जमिनी वाहून जाण्यामुळे किंवा पूर परिस्थितीमुळे, भूकंप यामुळे मोजणीच्या खुणा गेल्या, तरी अक्षांश आणि रेखांशांच्या साह्याने पूर्वीच्या खुणा मिळू शकणार आहेत. रोव्हर मशीनमुळे जमीन मोजणी ही उपग्रहाच्या साह्याने केली जाणार असल्याने ही मोजणी अचूक असणार आहे. रोव्हर मशीनसाठी राज्य सरकारकडून सुमारे ४० कोटी रुपये




प्राप्त झाले आहेत. मोजणी करण्यासाठी ७७ मोजणी स्थानके म्हणजे कंन्टिन्यूस ऑपरेशन रेफरन्स स्टेशन (कॉर्स) उभारण्यात येणार आहेत. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची जमीनधारणा ही डोंगराळ व कमी असली तरी शेताच्या बांधावरून होणारे वाद, कोर्टकचेऱ्या सर्वश्रुत आहेत. सध्या जमिनीच्या बांधाबांधांवरून घराघरात वाद दिसून येतात. धाराशिव शहरात भर चौकात जमिनीच्या वादावरून खून झाला. काही हद्दी मोडून जमीन बळकावण्याचे प्रकार घडतात. मात्र, रोव्हर मशीनद्वारे जमिनीचे अक्षांश आणि रेखांश हे निश्चित होत असल्याने हद्द मोडून दुसऱ्याच्या जमिनीमध्ये अतिक्रमण केलेले असल्यास ते समजू शकणार आहे. यापूर्वी प्लेन टेबलने जमीन मोजणी करण्यात येत होती. त्यामुळे जमीन मोजणीसाठी विलंब लागायचा. सध्या इलेक्ट्रॉनिक टोटल मशीन (ईटीएस) यंत्रांच्या साह्याने मोजणी केली जाते. मात्र या पद्धतीने होणाऱ्या मोजणीबाबत साशंकता निर्माण होत असे. इटीएस मोजणी यंत्राच्या काळात भूमि अभिलेख कार्यालयाकडून पुरेसे मनुष्यबळ नसणे, प्रशिक्षण घेऊनही काही कर्मचाऱ्यांना एटीएस मोजणी मशीन हाताळण्यास न जमणे यामुळे जिल्ह्यातील मार्च 2023 अखेर मोजणीसाठी आलेली 4523 प्रकरणी पैकी 2582 प्रकरणे निकाली प्रत देण्यात आली. तर 1939 प्रलंबित प्रकरणे आहेत. वर्षभरात मोजणीसाठी कोर्ट कमिशन केलेली एकूण 288 प्रकरण भूमी अभिलेख कार्यालयाकडे आवक झालेली असली तरी त्यापैकी 124 प्रकरणी अजून प्रलंबित आहेत तर कोर्टाकडून आलेली मोजणी प्रकरणे प्रलंबित ठेवून भूमि अभिलेख कार्यालयाकडून कोर्टाचा अवमान केल्याचे भासत आहे.

**जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी ऊपलब्ध असणाऱ्या रोव्हर मशीन..**

धाराशिव-4
तुळजापूर 4
उमरगा - 2
कळंब -3
भूम-3
वाशी - 2
परंडा -2
लोहारा -1

**एकूण रोव्हर मशीन 21**

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू




वाऱ्याचा वेग, चेंडूचे वजन, बॅटच्या फटक्यांचा जोर या सगळ्यांचा अंदाज घेऊन चेंडू टोलवावा लागतो. कुशल खेळाडू हे सरावामुळे सहज करू शकतो. ली यांच्यावर असलेली सिंगापूरची जबाबदारी काहीशी या खेळासारखीच नव्हती का ? सगळ्या गोष्टींचा अंदाज घेऊनच त्यांना हा चेंडू टोलवावा लागणार होता. त्यांना सिंगापूरला मानाचे स्थान प्राप्त करून द्यायचे होते. ली म्हणजे सिंगापूरला लाभलेला एक आगळावेगळा असा पंतप्रधान होता. सतत नवनवीन गोष्टी शिकून घेऊन स्वतःला अद्ययावत ठेवणे हा ली यांचा स्वभाव होता. ली यांनी अशीच एक आगळीवेगळी गोष्ट केली. त्यांनी सिंगापूरच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळत असतानाच १९६८ मध्ये अमेरिकेतील सुप्रसिद्ध हार्वर्ड बिझिनेस स्कुलमध्ये व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम शिकण्यासाठी प्रवेश घेतला. पंतप्रधान पदावर कार्यरत असताना जगातील कोणत्याही पंतप्रधानाने यापूर्वी असे केले नव्हते. या मॅनेजमेंटच्या अभ्यासाचा उपयोग त्यांना सिंगापूरचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे करण्यासाठी आणि सिंगापूरला प्रगतीपथावर नेण्यासाठी झाला. सिंगापूरमध्ये कमालीची विषमता होती. केवळ काही मोजक्याच लोकांजवळ स्वतःची घरे होती. ज्यांच्या हाती उद्योग आणि संपत्ती केंद्रित झाली होती, अशा लोकांजवळ भरपूर पैसे, स्वतःची प्रशस्त घरे होती. बहुसंख्य जनता झोपडीतच राहत होती. अवतीभवती घाणीचं साम्राज्य होतं. लोकांना उद्योगधंदा नव्हता. तसे लोक मेहनती पण त्यांना रोजगार उपलब्ध नव्हता. ली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या झोपडपट्टीत राहणाऱ्या आणि कामगार वर्गाला स्वतःची घरे मिळवून द्यायची योजना आखली. त्यासाठी हौसिंग डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन केले. अत्यंत कमी किमतीत गरीब जनतेला सुंदर आणि आवश्यक सुखसोयींनी युक्त अशी घरे बांधून दिली. अशा रीतीने झोपडपट्टीचा प्रश्न निकाली काढला. पण लोकांना अजून स्वच्छता, आरोग्याचे महत्व पटले नव्हते. त्यांच्या मंत्रिमंडळाने यासाठी अत्यंत कडक कायद्यांची तरतूद केली. लोकांचे प्रबोधन करणे आणि नियमांचे उल्लंघन केल्यास कडक शिक्षा वा दंड करणे अशी दुहेरी पद्धत त्यांनी अवलंबली.

## आनंदी पहाट



### जीवनात सौंदर्याचा शोध घेणे जरुरीचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या विचारांत सकारात्मकता असतेच असं नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं. त्यासाठी एक हक्काचं ठिकाण म्हणजे आपलं घर. घर केवळ चार भिंतींचं नसतं, घराचं घरपण आपण मिळवायचं असतं, त्या घरात मनाला रमवायचं असतं. आपल्याच घरात रोज नवं काहीतरी आजमावायचं असतं. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या शारीरिक दुखण्यामागे खरं तर मानसिक अस्वस्थता कारणीभूत असते. रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग असे मोठे आजार अथवा डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, चक्कर अशी छोटी दुखणी अनेकांना त्यांच्या मानसिकतेमुळे उद्‌भवलेली असतात. आपण आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं हे सर्वस्वी आपल्याच मानसिकतेवर, अंतर्मनातील विचारांवर अवलंबून असतं. आपल्या अंतर्मनाला आनंदी ठेवण्यातच आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. तो आनंद आपण स्वतःच निर्माण करायचा असतो. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकंच सौंदर्याला देखील महत्व असतं. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसं मिळवता येईल ह्यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. आपल्या जीवनामधील सौंदर्याचं स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपलं मनःस्वास्थ्य टिकून राहू शकतं.



आधुनिक केसरी

**काय वर्णू आता | कृपा त्याची ||**
काय सांगु माझे | भाग्य फळा आले ||
मौनाशीच बोले | मौन माझे ||१||
बाहेरी टणक | आतूनी मधाळ ||
लाभले श्रीफळ | ज्ञानेश्वरी ||२||
टेकविता माथा | माय झाली गाथा ||
आयुष्याची व्यथा | दूर झाली ||३||
आनंदाचा कंद | अंतरी फुलला ||
सुगंधित झाला | जन्म सारा ||४||
विटेवरी उभा | कृपावंत दाता ||
काय वर्णू आता | कृपा त्याची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


**अधमानां प्रवादे चविवादे दुर्जनस्य वै।
संवादे सज्जनानां च कालो गच्छति गच्छति ।।१ ।। अधमांचा काळ अफवा पसरविण्यात, दुर्जनांचा काळ भांडण्यात जातो. आणि सज्जनांचा काळ संवादात जात असतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


**दुख कारण अज्ञान है,
दुख कारण मय पाप ।
होय कर्म अज्ञान में, सो कारण दुख माप ।।४५।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/४५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
दुःखाचे कारण अज्ञान आहे, ज्यामुळे पाप होते तसेच अज्ञानामध्ये जे कर्म होते तेच दुःखाचे कारण आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २५वे

आधुनिक केसरी

**श्रीमहाराजांवरी गुरूकृपा जाहली
श्रीराम जय राम जय जय राम" हा
त्रयोदशाक्षरी मंत्र जपाची आज्ञा केली
अनुग्रह अधिकार ,रामदासी दीक्षा दिली ।।१ ।।
तुकामाई म्हणे श्रीमहाराजांना , अरे
प्रपंचात परमार्थ करावा, शिकवावे
स्थापावी राम मंदीरे, नाम प्रसार करावा
सेवा दीनांची करावी,प्रेम वाढवावे ।।२ ।।
श्रीमहाराजांवरी तुकामाई कृपा झाली
येहळेगावाहून प्रस्थान वेळ आली
गुरु आज्ञा होता श्रीमहाराज निघाले
गुरूंनी शिष्याला स्व-गुरु दर्शना नेले ।।३ ।।
गुरूं सहवासात श्रीमहाराज घडले
होऊनी ब्रह्मचैतन्य ,तेथूनी निघाले
तुकामाईचा निरोप वेळी अश्रू आले
श्रीमहाराज तेथूनी क्षेत्र उज्जैनी आले ।।४ ।।
गुरू शिष्य निरोपभेट ही वर्णन केली
कवी - अरुणदासाची लेखणी भिजली ।।**




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# संत कसे असतात ?

आधुनिक केसरी

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्‌गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दुःख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दुःख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल.



इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वतःच्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

**आजचे बोधवचन आहे - संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥
स्पष्टीकरण - आपल्या संस्कृतीत गुरूचे स्थान फार मोठे मानलेले आहे. परब्रह्माचा संबंध ज्ञानाशी असतो. ते ज्ञान गुरु आपल्याला देतो. म्हणून कोणत्याही विद्यार्थ्यांने गुरूचा अनादर करता कामा नये. गुरूचा अनादर म्हणजे खुद्द विद्येचा अनादर होय. गुरुकृपा ही माणसाला अनेक प्रकारे उपकारक ठरते.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, ४ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यांत काँग्रेस करणार विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. हे ऐतिहासिक वर्ष साजरे करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने स्थापन केलेल्या गौरव समितीचे अध्यक्ष व माजी मुख्यमंत्री आ. अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या कार्यक्रमांची रूपरेषा निश्चित करण्यात आली. याप्रसंगी बोलताना आ. चव्हाण म्हणाले की, मराठवाडा मुक्तिसंग्राम हा सर्वांसाठी आस्थेचा विषय आहे. मुक्तिसंग्रामाचे ७५ वे वर्ष साजरे करण्याबाबत राज्य सरकार उदासीन असले तरी मराठवाड्याचे नागरिक आणि देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी या नात्याने आपण आपले कर्तव्य पूर्ण केले पाहिजे. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पुढील मुक्तिसंग्राम दिनापर्यंत विविध कार्यक्रमांची आखणी करताना समाजातील विविध घटक त्यामध्ये सहभागी होतील, असे नियोजन करण्याची सूचना त्यांनी दिली. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात संभवतः छत्रपती संभाजीनगर येथे बैठक घेऊन कार्यक्रमांचे वेळापत्रक निश्चित केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.
बैठकीच्या प्रारंभी समितीचे समन्वयक व प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. संजय लाखे पाटील यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात माजी मुख्यमंत्री आ. अशोकराव चव्हाण यांनी पुढाकार घेऊन व पाठपुरावा करून मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष शासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात साजरे करण्याचा निर्णय करून घेतला. मात्र, सत्ताबदल झाल्यानंतर राज्य सरकारला या ऐतिहासिक वर्षाचा जणू विसरच पडला आहे. या बैठकीत मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यातील सदस्य उपस्थित होते. काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी अनिल पटेल, कल्याण काळे, रवींद्र दळवी, तुकाराम रेंगे पाटील, भाऊराव पाटील गोरेगावकर, राजाभाऊ देशमुख, विलास औताडे, अमरनाथ राजूरकर, शेख युसुफ, दिलीपराव देसाई, राजेसाहेब देशमुख, धीरज कदम पाटील आदींनी आपली मते मांडली.

# विदर्भात दाटले धुके

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पावसाच्या अलगद पडणाऱ्या सरी आणि दाट धुक्यात हरवलेले चिखलदरा अनुभवायला पर्यटकांची पावले पावसाळा आणि हिवाळ्यात चिखलदऱ्याकडे वळतात. विदर्भाचे हे काश्मीर भर उन्हाळ्यात दाट धुक्यात हरवले आणि पर्यटकांची पावले आताच तिकडे वळायला लागली आहे.

अल्केश ठाकरे यांनी धुक्यात हरवलेला चिखलदरा अलगदपणे कॅमेऱ्यात टिपला. अवकाळी पावसामुळे दऱ्याखोऱ्यात वसलेले मेळघाट भर उन्हाळ्यात हिरवेगार झाले आहे. येथील दऱ्याखोऱ्यांवर हिरवाईची चादर पसरली आहे. त्यातही विदर्भाचे काश्मीर असलेल्या चिखलदऱ्यातील वातावरणाने पर्यटकांना वेड लावले आहे. मेळघाट आणि चिखलदऱ्याचे सौंदर्य अनुभवायचे असेल तर पावसाळा आणि हिवाळा हे दोन उत्तम ऋतू. भर उन्हाळ्यातील अवकाळी पावसाने तीच स्थिती एप्रिलमध्ये निर्माण केली आणि दाट धुक्यात हरवलेले चिखलदरा अनुभवण्यासाठी पर्यटक तिकडे वळू लागले. पावसाळा सुरू झाला की पर्यटकांना हमखास चिखलदऱ्याची आठवण येते. सकाळी पडलेले धुके आणि त्या धुक्यातून वाट काढताना पर्यटक अक्षरशः हरखून जातात.



बीड-न्युज 18 लोकमत वृत्तवाहिनीचे वृत्त निवेदक,प्रसिद्ध पत्रकार विलास बडे आणि मिरर नाऊ चे सहयोगी संपादक मंदार फणसे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयात रविवार दि.30 एप्रिल रोजी सदिच्छा भेट दिली. त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित होते.

# प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा : ॲड. उषाताई दराडे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जाणता राजा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरुन निवृत्त होण्याचा निर्णय घेतल्यामुळे मी प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे पाठवला आहे. असे प्रसिद्धी पत्रकात राष्ट्रवादीच्या माजी आमदार तथा प्रदेश उपाध्यक्षा ॲड.उषाताई दराडे यांनी म्हटले आहे. देशात आणि राज्यात राजकीय वातावरण अस्थिर झाले आहे. भारतातील लोकशाही संकटात सापडली आहे काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा राजकीय परिस्थितीतून भारताला सावरण्यासाठी आणि देशातील जनतेला ठाम विश्वास देण्यासाठी आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांसारखे नेतृत्व राजकारणात सक्रीय असणे गरजेचे आहे. अन्यथा सत्ताधारी या देशातील लोकशाही पायदळी तुडवतील. तेंव्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष



शरदचंद्र पवार साहेब यांनी आपल्या घेतलेल्या निर्णयावर गांभीर्याने पुनर्विचार करुन देशाच्या हितासाठी निर्णय बदलणे गरजेचे आहे. जर साहेब आपल्या मतावर ठाम राहिले तर या देशाचे राजकीयदृष्ट्या मोठे नुकसान होईल. माझी श्रध्दा आणि ऊर्जा म्हणजेच पवारसाहेब आहेत. जर ते राजकारणात पदावर सक्रीय राहणार नसतील तर मी देखील प्रदेश उपाध्यक्ष पदावर सक्रीय राहणार नाही. असे प्रसिद्धी पत्रकात माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा ॲड.उषाताई दराडे यांनी म्हटले आहे.

# धुळे ते दादर रेल्वेसेवा मोठी बचत..!



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे मुंबई जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे धुळे ते दादर जाण्यासाठी खूप माफक दरात रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे त्यासाठी हप्त्यात तीन वेळा प्रवास करता येईल धुळे रेल्वे स्टेशन येथून नुकतीच ट्रेन सेवा खा. सुभाष भामरे यांच्या हस्ते करण्यात आली. त्यासाठी पहिल्याच दिवशी उत्कृष्ट प्रतिसाद देखील मिळाला आहे. कित्येक दिवसापासून धुळेकरांची मागणी होती की धुळे मुंबई रेल सेवा पुन्हा सुरू व्हावी हे लक्षात घेता रेल्वे मंत्राकडून या सेवेचा हिरवा झेंडा दाखवण्यात आला. धुळेकर नागरिकांसाठी याचा खूप मोठ्या प्रमाणे फायदा आहे जसे की कित्येक दिवसापासून अनेक खाजगी बस कडून सामान्य नागरिकांना जास्त पैसे मोजावे लागत होते.जसे की धुळे मुंबई जाण्यासाठी ८०० ते १००० रुपये मोजावे लागतात. नागरिकांना दुसरा पर्याय नसल्याने खाजगी बसणे प्रवास करावा लागत होता. व काही ठिकाणी खाजगी बसणे होणारे अपघाताचे प्रमाण देखील वाढले त्यामुळे नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण देखील असते. त्यामुळे सामान्य नागरिकांना दिलासा देणारा एक पर्याय म्हणून धुळे दादर रेल्वे सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. या रेल्वे सेवेचा पहिल्याच दिवशी चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला असे स्टेशन मॅनेजर जाधव सर यांनी प्रसार माध्यमांना सांगितले. व त्यांनी नागरिकांना असे आव्हान केले आहे की या धुळे ते दादर ट्रेन सेवा बद्दल नागरिकांचा अशाच प्रकारे चांगला प्रतिसाद मिळाला तर ही रेल्वे सेवा जास्त दिवस व कायमस्वरूपी सुरू ठेव आश्वासन देण्यात आले व सर्व धुळेकर नागरिकांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# पुढे गेलेली मालगाडी अचानक आली मागे

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** रेल्वे क्रॉसिंगवरून रूळ ओलांडत असताना अचानक मालगाडी धडधडत आली व चारचाकीवर आदळली. वाहनचालक थोडक्यात बचावला. रविवारी रात्री मालगाडी जाणार असल्याने गेटमॅनने बोखारा गोधनी रेल्वे गेट बंद केले. त्यामुळे गेटच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या. मालगाडी पुढे गेल्यानंतर गेट मॅनने फाटक उघडले फाटक उघडताच दोन्ही बाजूला प्रतीक्षेत असलेली वाहने रुळ ओलांडू लागली. दरम्यान पुढे निघून गेलेली मालगाडी मागे येऊ लागली. त्यामुळे रेल्वे क्रासिंगवरून वाहने काढणाऱ्या वाहन चालकांमध्ये गोंधळ उडाला. आरडाओरड सुरू झाली. मालगाडी नजिक आली. तेव्हा अमोल घरमारे यांची कार रुळावर होती. वाहनांची गर्दी असल्याने अमोलला हलता आले नाही. जीव वाचविण्यासाठी त्याने बाहेर उडी घेतली. मालगाडीची धडक त्याच्या कारला बसली. कारच्या समोरील भाग संपूर्ण तुटला. या घटनेत मोटारसायकल चालक जखमी झाला. या प्रकरणी फिर्यादी अमोल घरमारे (३५), रा. हुडकेश्वर यांच्या तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी मालगाडीचे चालक (लोकोपायलट) आणि गेट मॅन विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. दरम्यान मोटारसायकल चालक अक्षय कोठे (३०), रा. झिंगाबाई टाकळी हा जखमी झाला. तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.




## काँग्रेसचा जाहीरनामा

आधुनिक केसरी

कर्नाटक विधानसभा निवडणूक अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. यासाठी सर्वच पक्षांकडून प्रचाराचा धडाका सुरू आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी भाजपाने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यापाठोपाठ आता काँग्रेसनेही आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. कर्नाटकरमध्ये सत्ता आल्यास बजरंग दल आणि पीएफआयसारख्या संघटनांवर बंदी घालू असे आश्वासन या जाहीरनाद्वारे देण्यात आले आहे. कर्नाटकमधील मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसकडून अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. काँग्रेस पक्षाने कर्नाटकमध्ये सरकार आल्यास बजरंग दल आणि पीएफआयवर बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबाला २०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासनही काँग्रेसकडून देण्यात आले आहे. याबरोबरच कुटुंबातील प्रत्येक महिलेला दरमहा दोन हजार रुपये आणि महिलांसाठी राज्य सरकारी बसमध्ये मोफत प्रवासाची घोषणा या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे. याशिवाय तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी बेरोजगार पदवीधरांना दरमहा तीन हजार रुपये देण्याची घोषणाही या जाहीरनाम्याद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर भाजपा आणि बजरंग दला आणि विश्वहिंदू परिषदेने आक्षेप घेतला आहे. बजरंग दलाची तुलना पीएफआय सारख्या दहशतवादी संघटनेशी करणे हे दुर्दैवी आहे. आम्ही यासंदर्भात आम्ही काँग्रेसला कायदेशीर उत्तर देऊ, अशी प्रतिक्रिया विश्वहिंदू परिषदेचे नेते सुरेंद्र जैन यांनी दिली.

# पवारसाहेब, निवृत्त व्हा... पण १६ महिन्यांनंतर



मधुकर भावे
ज्येष्ठ पत्रकार

आधुनिक केसरी

**शरदपवार साहेबांनी आठ दिवसांपूर्वी 'भाकरी फिरवण्याची वेळ आली आहे...' असे सूचित केले होते. आठ दिवसांत त्यांनी भाकरी फिरवली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद सोडले. नवीन अध्यक्ष नेमण्यासाठी एक समिती नेमली. पवारसाहेबांचे सर्वच निर्णय पटापट असतात. त्याचा थांगपत्ता लागत नाही. त्यांच्या या निर्णयामुळे महाराष्ट्राला धक्का बसला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात हलकल्लोळ झाला. सुरुवातीलाच मुद्याला हात घालून सांगतो की, 'पवारसाहेब तुमची निवृत्तीची घोषणा अवेळी झाली. अवकाळी पावसामुळे जशी पिकाची हानी होते, तुमच्या या निर्णयाने अशीच महाराष्ट्राच्या राजकारणाची मोठी हानी होणार आहे. तुम्ही निर्णय योग्य केलात... पण तो १६ महिन्यांनंतर लागू होईल, असे जाहीर करा...**

लोकसभेच्या निवडणुका पुढच्या २५ मे पर्यंत आटोपलेल्या असतील... विधानसभेच्या निवडणुका महाराष्ट्रात ऑक्टोबर २०२४ अखेर पर्यंत संपलेल्या असतील... तुम्ही त्यानंतर निवृत्त व्हा.

हाता-तोंडावर ही लढाई आलेली आहे. जे २०१९ साली जमणे शक्य नव्हते ते २०२४ साली निदान महाराष्ट्रात आणि दक्षिणेतील जवळपास सर्व राज्यात भाजपाच्या पराभवाचे वातावरण आहे. अशावेळी तुमच्यासारखा योद्धा आणखी १६ महिने दोन दांडपट्टे हातात घेवून महाराष्ट्राला हवा आहे... देशाला हवा आहे... तुमचं वय झालं... निसर्ग नियमाने काही बंधने आली... दुर्धर आजारावर मात करून, तुम्ही तुमच्या प्रचंड इच्छाशक्तीने आजच्या तारखेपर्यंतची लढाई अशा टिपेवर आणून ठेवली आहे की, आताच्या या घटकेला तुम्ही अध्यक्षपदावरून दूर होणे म्हणजे भाजपामध्ये दसरा- दिवाळी साजरी होणे आहे... तुमच्या इच्छाशक्तीवर तुम्ही सर्वकाही रेटून नेले... सकाळी ७ वाजता तयार होणारा आणि दिवसभरात शेकडो लोकांना ऑपॉईटमेंटशिवाय भेटणारा तुमच्यासारखा दुसरा नेता देशात नाही... ४० संस्थांचे तुम्ही प्रमुख आहात. राजकारणाच्या पलिकडचे तुम्ही आहात.... सत्ता असो... नसो... तुमच्या भोवती गर्दी आहे. खरा नेता तोच असतो... सत्ता नसताना ज्याच्याभोवती गर्दी असते. आज देशात तुमच्याएवढा आवाका असलेला दुसरा नेता कोणीही नाही. पदावरचे नेते पदामुळे मोठे वाटतात... पद गेले की, त्यांची समाजात 'पत' काय आहे, हे पाच मिनीटांत समजून येते... तुमचे तसे नाही आणि म्हणून तुम्हाला हात जोडून सांगणे आहे.... पुढचे १६ महिने तुम्ही ज्या ज्या संस्थांचे प्रमुख आहात, त्या सर्व संस्थांचे काम थांबवा. १६ महिने महाराष्ट्राच्या राजकारणाला आणि देशाच्या राजकारणाला द्या. तुम्ही जाहीर केले आहे, राजकारणातून बाजूला झालो असलो तरी समाजकारणात राहणार आहे. साहेब, हे वाक्य भावनात्मक आहे. तुम्ही आता ज्या जागेवर आहात त्या जागेवर १६ महिने राहिल्याशिवाय हाता-तोंडाशी आलेले हे वातावरण उचकटून जायला वेळ लागणार नाही. आता महाराष्ट्रात तरी सध्याच्या सरकाराविरोधात जबरदस्त वातावरण आहे. तुमच्या सततच्या प्रयत्नाने महाविकास आघाडी झालेली आहे. या आघाडीला तुमच्याशिवाय पुढचे १६ महिने सांभाळणे जवळपास अशक्य आहे. आघाडीतील कोणी चुकले तर, त्याला दोन शब्द सुनावण्याची ताकद, त्याचा कान धरण्याची ताकद फक्त तुमच्याकडे आहे. आघाडीचे सोडून द्या. आघाडी सरकारात तब्बल दोन वर्ष राहिल्यावर ज्या एकनाथ शिंदे यांना काँग्रेस- राष्ट्रवादीबरोबर सत्तेत सहभागी झाल्याचा पश्चाताप झाला त्या मुख्यमंत्री शिंदे यांना कोकणातल्या रिफायनरी प्रकल्पाबद्दल तुमच्याशी चर्चा करण्याकरिता उद्योगमंत्र्याला पाठवावे लागले. हा जो उद्योगमंत्री तुम्हाला भेटायला आला... तोही असा की, ज्याला राजकारणात तुम्हीच आणलेत... विधानसभेत तुम्हीच पहिले तिकीट दिलेत... निवडून तुम्हीच आणलेत... राज्यमंत्री तुम्हीच केलेत... नगरविकास खाते तुम्हीच दिलेत... पण, कृतघ्न निघाले... अशी कितीतरी माणसं तुम्ही घडवलीत... मोठी केलीत... ती पळून गेली. १९८० साली तुमच्या पक्षाचे ५० आमदार तुम्हाला सोडून झटकन सत्ताधारी बाकावर बसले. तुम्ही क्षणभरही अस्वस्थ झाला नाहीत... पाच आमदारांना घेवून तुम्ही लढाई लढलीत... १९८५ च्या निवडणुकीत पुन्हा नव्याने ५५ आमदार निवडून आणलेत... आजही महाविकास आघाडीतील तुमच्या पक्षाचे ५४ आमदार आहेतच... स्वतंत्र पक्ष काढून ५०-५५ आमदार निवडून आणणे ही ताकद फक्त तुमची आहे. शिवसेनेचे जे आमदार विजयी होतात, ती उद्धव ठाकरे यांना मिळालेली बाळासाहेबांची विरासत आहे... तुम्ही स्वतंत्र पक्ष काढलात... महाराष्ट्रात उभा केलात... १९९९ साली तुमच्या पक्षाचे जास्त आमदार असताना तुम्ही विलासराव देशमुख यांना मुख्यमंत्री व्हायला मान्यता दिलीत... राजकारणात कुठे लवचिक असावं, कुठे कणखर असावं, एकहाती निवडणूक कशी लढवावी... कशी जिंकावी... पावसात भिजल्यानंतर महाराष्ट्राला वाटले.... सह्याद्री पावसात भिजला... २०१९ च्या निवडणुकीनंतर निर्माण झालेले सरकार तुमच्या राजकीय ताकदीवरच आकाराला आले. नाही तर ते शक्य नव्हते. पवारसाहेब... आता जर या लढाईच्या ऐन मोक्याला तुम्ही बाजूला होण्याची भूमिका घेतलीत तर आताच सांगून ठेवतो... भाजपाला मोकळं रान आहे... महाराष्ट्रातील आजचे सरकार हे स्टेपनी सरकार आहे. मुख्यमंत्र्यांना भाजपाने खाऊन टाकलेले आहे. त्यांनी काढलेली जी शिवसेना आहे... ती निवडणुकीच्या आगोदरच भाजपामध्ये विलीन होणार आहे. तुम्ही एकमेव नेते असे आहात... की तुम्ही एकट्याने काढलेला पक्ष महाराष्ट्रात टिकला. यापूर्वी विविध कारणांनी काँग्रेसशी मतभेद होवून जे जे नेते बाहेर निघाले त्यापैकी कोणी 'म. स. का. काढला (महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस- शंकरराव चव्हाण), कुणी भा. रि. का. (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस- बॅ. अंतुले).. महादेव जानकर नावाचे एक मंत्री होते... त्यांनी त्यांचा एक पक्ष काढला... तुमच्या नेतृत्त्वाची हीच ताकद आहे. शिवाय राजकारण सुसंस्कृतपणे, सभ्यतेने कसे करावे, हा यशवंतराव चव्हाण यांचा संस्कार तुम्ही नुसता पचवला नाही तर तो महाराष्ट्रात वाढीला लावला. आज अशा संस्कारांवरच टोळधाड आलेली आहे. अशावेळी विकासाचा महाराष्ट्र, संसंस्कृत राजकारणाचा महाराष्ट्र, राजकारणाच्या बाहेर सर्वविषयांमध्ये सर्वांना मदत करण्याची भूमिका घेणारा महाराष्ट्र... त्यासाठी लागणारा नेता म्हणून महाराष्ट्र तुमच्याकडे पाहतोय... तुम्ही केवळ राजकीय नाहीत.. राजकारणाच्या बाहेरचे ५० विषय असे आहेत की, जिथे तुम्ही तुमची पाऊले उमटवली आहेत. एक महिन्यापूर्वी विनोद कांबळी याचे निवेदन होते, 'घरी आर्थिक परिस्थिती बिकट झाली असताना आज जे काही जगतोय ते शरद पवारसाहेब क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष असताना त्यांनी दिलेल्या महिना ३० हजार रुपयांच्या अनुदानामुळे....' तुम्ही कुठे-कुठे आहात.. २५ मे २०१९ ला लोकसभा निवडणूक झाली... २६ मे च्या रात्री महाराष्ट्रातील जवळपास सर्व राजकीय पक्षांचे नेते कोणी सिंगापूरला गेले... कोणी जिनेव्हाला गेले... २७ मे २०१९ च्या वृत्तपत्रात पहिल्या पानावर एक फोटो प्रसिद्ध झाला.... ४३ डिग्री तापमानात सांगाल्यातील शेतात एका शेतकऱ्याच्या खांद्यावर हात टाकून एक नेता शेतीतील आलेल्या संकटाची चर्चा भर उन्हात करतोय.... बाकी नेते थंड हवेच्या ठिकाणी पोहोचले होते. आणि तुम्ही सांगोल्याच्या शेतात भर उन्हात उभे होतात. इतर नेते आणि तुम्ही, यात हाच मोठा फरक आहे. त्यामुळे तुम्ही निव्वळ राजकारणी नाही... सर्व क्षेत्रातील लोकांना तुम्ही हवे आहात... अनेकांना कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हवे आहात. अनेक लेखकांना पुस्तकाचे प्रकाशन करायला तुम्ही हवे आहात... शेतकऱ्यांना तुम्ही शेती प्रदर्शनाचे उद्घाटन करायला हवे आहात... तुमची कार्यक्रमाची डायरी मला माहिती आहे.... सतीश राऊत प्रत्येक दिवशी ते कार्यक्रम टाईप करून तुमच्यासमोर ठेवतात. पुढच्या चार-चार महिन्याच्या सर्व तारखा तुमचे कार्यक्रम ठरलेले आहेत. याचीही कल्पना आहे... आता ते सर्व कार्यक्रम १६ महिने बाजूला ठेवा... फक्त महाराष्ट्राच्या राजकारणासाठी आणि यशवंतरावांच्या कल्पनेतील महाराष्ट्राची पुन्हा स्थापना करण्यासाठी हे १६ महिने तुम्ही आम्हाला द्या. मला हे माहिती आहे की, तुमच्या शारिरीक मेहनतीची आणि होणाऱ्या त्रासाची प्रतिभावहिनींना, तुमची लाडकी लेक सुप्रिया ताईला, अजितदादांना कल्पना आहे. दोन महिन्यांपूर्वी सुप्रिया ताईंच्या मतदारसंघात खडकवासला येथे एका सभेला गेलो होतो. तिथे ताईला म्हणालो... 'साहेबांचे कार्यक्रम आता थोडे कमी करा... खूप दगदग होते आहे...' सुप्रिया ताई म्हणाली की, 'आम्ही सांगून थकलो... आता तुम्ही सांगा...' शिर्डी येथे राष्ट्रवादी पक्षाचे शिबिर झाले.. त्या शिबिरात जयंतराव पाटीलयांनी मला बोलावले होते. अजित दादाची भेट झाली. तुमच्या सततच्या कार्यक्रमाच्या दगदगीबद्दल दादांशी बोललो. दादा तेच म्हणाले, 'साहेब ऐकायला पाहिजेत ना.....' मला ही गोष्ट मान्य आहे... घरात बसून राहिले तर आजारपण वाढते... मी तुलनेसाठी सांगत नाही... मी आता चार महिन्यांनी ८४ वर्ष गाठेन... घरात बसलो तर आजारपण येते... कामाला बाहेर पडलो तर प्रकृती ठणठणीत राहते. काम करत रहा.... प्रकृती उत्तम राहते, हे ही मान्य.. पण, तुम्ही सध्या बाकी सगळे कार्यक्रम बाजूला ठेवण्याचे जाहीर करा आणि पुढचे १६ महिने फक्त महाराष्ट्राच्या राजकारणाकरिताच द्या. भाकरी फिरवली पाहिजे, हे मान्य... नाहीतर करपणार... 'नवीन पिढीला संधी दिली पाहिज,', हेही मान्य. पण हे सगळं १६ महिन्यांनंतर. आता तुमचे या क्षणाला बाजूला होणे, तुम्हीच मेहनत करून निर्माण केलेल्या भाजपाविरोधी वातावरणाला छेद देणारे ठरेल. उत्तराधिकारी नेमा... पण, १६ महिन्यांनी. शिवाय खरं सांगू का... तुम्ही कोणाचेही नाव घ्या... कोणालाही अध्यक्ष करा... 'शरद पवार' या नावाची ताकद ... आवाका... महाराष्ट्रात आज तरी कोणाकडेही नाही. उद्धव ठाकरे यांच्या जागी तुम्ही आघाडीचे मुख्यमंत्री असता तर हे सरकार पडलेच नसते. राज्याच्या प्रमुखाला ५० आमदार पळून अर्धा रस्ता गाठेपर्यंत पत्ता लागत नाही... तुम्ही तुमच्या 'लोक माझ्या सांगाती...' दुसऱ्या भागात या दुखण्यावर नेमके बोट ठेवले आहे.

आणखीन एक गोष्ट सांगतो... महाविकास आघाडी तीन पक्षांची आहे. पण या आघाडीत सध्यातरी काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष शिवसेनेच्या मागे फरफटत चालले आहेत. असे दृष्य आहे. पुण्याचे माजी महापौर आणि प्रभावी कार्यकर्ते अंकुशराव काकडे यांनी याच विषयावर नेमके बोट ठेवले आहे. बी. के. सी. तील सभा झाली. दुसऱ्या दिवशीचा 'सामना' पाहिल्यावर ही सभा शिवसेनेचीच होती, असे वाटले. अजितदादा, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, सगळे आतल्या पानावर.. हे तुम्ही आज अध्यक्ष असताना... तुम्ही अध्यक्ष पदावरून बाजूला झालात की, कोणालाच कोणाचाही, कसलाही धाक राहणार नाही. आज दुर्दैवाने काँग्रेसजवळ तगडा नेता नाही. कोणाला खरे वाटणार नाही.. १९६७ साली संपूर्ण देशात नऊ राज्यांत काँग्रेसचा पहिल्यांदा पराभव झाला. त्यावेळच्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचे २०२ आमदार निवडून आले. त्यात प्रथम निवडून आलेले तुम्हीही होतात. १९७२ साली २२२... आज काँग्रेस ४४ आमदारांवर आहे. ते यशवंतराव नाहीत... वसंतराव नाईक नाहीत... प्रदेश काँग्रेसचे तेव्हा अध्यक्ष असलेले वसंतदादा नाहीत. विलासराव होते... तेही काळाने निघून गेले... पतंगरावही गेले.... भाजपामधील गोपिनाथ मुंडे गेले... आपले आर. आर. आबा गेले... लोकांमध्ये स्थान असलेली ही चांगली माणसं गेली. अशावेळी एकखांबी नेते म्हणून पवारसाहेब, तुम्ही आहात. क्रिकेटचा सामना एकहाती जिंकून देण्याची ताकद आजही फक्त धोनीजवळ आहे. राजकारणातील कोणताही सामना एक हाती जिंकून देण्याची ताकद फक्त तुमच्यामध्ये आहे. महाविकास आघाडीमधील ऐक्य टिकून राहण्यासाठी फक्त तुम्ही आणि तुम्हीच, हे काम करू शकाल. तुम्हीच दूर झालात तर होणार कसे ? . आणि म्हणून हात जोडून विनंती करतो.. पवारसाहेब, निवृत्त व्हा ... पण, १६ महिन्यांनंतर... आणि आणखीन एक सांगू का..... तुम्ही निवृत्तीची घोषणा केलीत तरी तुम्हाला घरात बसवणार नाही. सामाजिक काम तुम्ही करणारच आहात... प्रतिष्ठानमध्ये तुम्ही बसणारच आहात... दौरे करणारच आहात... रोज शेकडो लोकांना भेटणारच आहात... मग हे सगळं करणारच आहात तर १६ महिने पक्षाचे अध्यक्ष राहून तेवढे महिने महाराष्ट्रासाठी द्या. महाराष्ट्रात परिवर्तन होतेय की नाही ते पहा... पण, तुम्ही निर्णय बदलला नाहीत तर, हाता-तोंडाशी आलेले लोकशाही वाचवण्याचे हे काम भलते पेंढारी पीक कापून घेवून जातील... आणि त्याचा दोष तुमच्या पदरात पडेल... ऐन लढाई समोर आली असताना फक्त १६ महिन्यांसाठी तुम्ही मैदानातून दूर होऊ नका. एवढेच हात जोडून तुम्हाला सांगणे.

# जंटलमन्स गेम ही ओळख पुसली जाणार नाही याची काळजी घ्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**क्रिकेट हा सभ्य माणसांचा खेळ म्हणून ओळखला जातो म्हणूनच क्रिकेटला जंटलमन्स गेम असेही म्हटले जाते. जगभरातील अनेक माजी दिग्गज खेळाडूंनी मैदानावरील आपल्या वर्तुणुकीतून आदर्श घालून देत या खेळाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले आहे. आपल्या वर्तुणुकीतून क्रिकेटला गालबोट लागणार नाही आणि क्रिकेटची जंटलमन्स गेम ही ओळख पुसली जाणार नाही याचीच दक्षता माजी खेळाडूंनी घेतली पण अलीकडे क्रिकेटमध्ये प्रचंड व्यावसायिकता आली आहे.**

त्यामुळे खेळाडूंचा संयम संपत चालला आहे. याचाच प्रत्यय १ मे या दिवशी लखनौच्या अटलबिहारी वाजपेयी मैदानात लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर बंगळुरू या संघात झालेल्या सामन्यानंतर आला. सध्या क्रिकेटमध्ये याच सामन्याची अधिक चर्चा होताना दिसत आहे. १ मे ला लखनौ आणि बंगळुरू यांच्यात सामना होता. या सामन्यात पहिली फलंदाजी करताना बंगळुरुने अवघ्या १२६ धावा काढल्या. १२७ धावांचे माफक आव्हान लखनौ सहज पार करेल असे वाटत होते मात्र बंगळुरूच्या गोलंदाजांनी अनपेक्षितपणे चांगली कामगीरी करून लखनौला १०८ धावात रोखले आणि विजय मिळवला. सामना चालू असतानाच बंगळुरुचा कर्णधार विराट कोहली आणि लखनौचा फलंदाज नवीन यांच्यात तू तू मै मै झाली. अर्थात क्रिकेटमध्ये असे प्रसंग नेहमीच घडतात मात्र खरे नाट्य रंगले ते सामान्यानंतर, दोन्ही खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करताना. यावेळी लखनौचा प्रशिक्षक गौतम गंभीर विराटकडे रागाने पाहत होता विराटनेही त्याला खुन्नस दिल्यावर तो विराटच्या अंगावर धावून गेला आणि या दोन्ही जेष्ठ आणि अनुभवी खेळाडूत मैदानावरच राडा झाला. दोन्ही संघाच्या सहकारी खेळाडूंनी दोघांनाही अडवल्याने पुढील अनर्थ टळला. या दोन्ही खेळाडूंच्या अशा अखिळाडू वृत्तीने क्रिकेटला गालबोट लागले आहे. गंभीर आणि कोहली हे दोघेही भारताचे जेष्ठ खेळाडू आहेत. दोघांनीही भारताचे नेतृत्व केले आहे. दोघेही आक्रमक खेळाडू असले तरी त्यांनी तरी त्यांनी मैदानावर संयम राखायला हवा होता. आपण देशाचे प्रतिनिधित्व केले आहे म्हणजे आपण देशाचे राजदूत आहोत. आपल्या मैदानावरील वर्तुणुकीमुळे खेळाची तर अप्रतिष्ठा होतेच पण देशाचीही मान शरमेने खाली झुकते याचे भान या खेळाडूंनी ठेवायला हवे. हे दोघेही जेष्ठ खेळाडू आहेत नवीन येणारे युवा खेळाडू यांना आदर्श मानतात. जर हेच खेळाडू मैदानात असा राडा करून खेळाची अप्रतिष्ठा करत असेल तर तरुण खेळाडूंकडून तरी प्रेक्षकांनी काय अपेक्षा ठेवावी ? युवा खेळाडूंपुढे आदर्श निर्माण करावा अशी वर्तणूक जेष्ठ खेळाडूंची हवी. केवळ मैदानातच नाही तर मैदानाबाहेरही खेळाडूंची वर्तणूक आदर्श हवी. सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, महेंद्रसिंग धोनी या खेळाडूंनी आपल्या खेळातुनच नव्हे तर वर्तणुकीतुनही आदर्श निर्माण केला म्हणून ते महान खेळाडू म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच क्रिकेटप्रेमींच्या मनात त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. मैदानावर किंवा मैदानाबाहेर कितीही दबाब असला तरी या खेळाडूंनी आपला संयम सोडला नाही. आताच्या खेळाडूंनी देखील या महान खेळाडूंचा आदर्श ठेवावा. आपल्या वर्तुणुकीतून क्रिकेटची अप्रतिष्ठा होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. संघ मालकांनीही कर्णधार, प्रशिक्षक किंवा संघातील खेळाडूंवर दबाव आणू नये. जंटलमन्स गेम ही क्रिकेटची ओळख पुसली जाणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# धर्माबाद तालुक्याला अवकाळीचा तडखा

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत कधी मिळणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील शेतकऱ्यांना व नागरिकांना अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. या अवकाळी संकटात अनेकांच्या घरावरची पत्रे उडून गेली, काही ठिकाणी गुरे ढोरांना जीव गमवावा लागला. आणि नेहमीप्रमाणे बळी राजाला नुकसान सहन करावे लागले. शनिवारी धर्माबाद तालुक्यातील रामपूर, बाभळी, मंगनाळी, चिकना, जारीकोट, सायखेडा, करखेली, येवती, येताळा, बेल्लूर व नायगावसह जवळपास सर्वच भागात सोसाटायचा वारा, वादळ व पाऊस झाले.यामुळे अनेकांच्या घरावराचे छप्परे उडून गेल्यामुळे त्यांचे संसार उघड्यावर पडले आहेत. रामपूरचे प्रगतशील शेतकरी नारायण पा.पवार यांनी आपल्या दोन एकर शेतात भरभणी मोती ज्वारीची लागवड केली.तीन वेळा पाणी दिले खरीप व रब्बी हंगामात झालेल नुकसान उन्हाळी पिकात तरी भरून काढता येईल ही भाबडी आशा होती. मात्र अवकाळी पाऊस आले आणि हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेला. पुंडलिक लक्ष्मण समस्ते यांनी आपल्या दीड एकर शेतात ३५० पपईच्या झाडांची लागवड केली. दैव बलवत्तर व निसर्गकृपा यामुळे त्यांना पपईच्या पिकाचे तीन बाहर घेता आले. चौथा बाहरही पदरात पडेल अशी अपेक्षा असताना निसर्ग कोपला आणि जवळपास दोन लक्ष रुपयांचे नुकसान झाले आहे.



**नुकसान भरपाई कधी ?**
अस्मानी संकट आपल्या हाती नसले तरी स्वत :ला शेतकऱ्यांचे सरकार म्हणून घेणार सरकार ( सुलतानी ) तरी आपल्या पाठीशी खंबीर उभे रहावे ही शेतकऱ्याची अपेक्षा आहे .मात्र अजूनही शासनाकडून कोणातही पंचनामा झाला नाही .बळीराजाच्या भावनाशी खेळ न खेळता तात्काळ मदत करावी अशी मागणी पुंडलिक लक्ष्मण समस्ते यांनी केली आहे .



गोरगरीब लोकांचे संसार उघड्यावर आले आहेत . शेतकरी अडचणीत सापडला आहे . त्यामुळे त्याना धीर देण्यासाठी तात्काळ मदत करावी .

**नारायण पा . पवार**

# आयकर विभागाचा उपक्रम आज शहरात इ व्हेरिफिकेशन स्कीम चर्चासत्र

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आयकर विभागातर्फे इ व्हेरिफिकेशन स्कीम संदर्भात चर्चा सत्राचे आयोजन केले आहे, अशी माहिती आयकर अधिकारी शकीलखान यांनी प्रसिध्द केलेल्या पत्रकात दिली आहे. ४ मे रोजी सकाळी ११.३०ते १ या वेळेत बीड बायपास सातारा परिसर येथील ICAI भवन येथे आयोजित करण्यात आले आहे.या चर्चासत्राला आयकर संचालक राजीव कुमार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. २मे रोजी या कार्यक्रमाचे नाशिक शहरात आयोजन करण्यात आले होते. या प्रक्रियेबद्दल माहिती देतांना वरिष्ठ सूत्रांनी सांगितले की, आयकर विभागाकडे असलेला वनागरिकांचा डेटा व बँका व रजिस्ट्रार कार्यालय यांच्याकडे असलेला डेटा याची पडताळणी केली जाते. बँका व रजिस्ट्रार कार्यालय त्यांचा डेटा आयकर विभागाच्या पोर्टलला अपलोड करत असतात. जर अपलोड केलेल्या डेटा आणि आयकर विभागाकडे भरलेले रिटर्न्स यात तफावत आढळली तर संबंधित नागरिक किंवा संस्थेला या फरका बाबत विचारणा केली जाते. प्रकरण मोठ असेल तर कारवाई केली जाते.हा कार्यक्रम जनजागृतीच्या दृष्टीने घेण्यात येत असल्याने शहरातील जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन छत्रपती संभाजीनगर आयकर विभागातर्फे करण्यात आले.



# दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठान पुरस्कारांचे 19 मे रोजी वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** कै.दुर्गादास पत्रकार प्रतिष्ठाण च्या वतिने गेल्या चार वर्षापासून पत्रकारांचा सन्मान केल्या जातो. सन 2022 चे पत्रकारीता पुरस्कार जानेवारी महिन्यात जाहीर करण्यात आले. यामध्ये राज्यस्तरीय, मराठवाडा स्तरीय तसेच जिल्ह्यातील पत्रकारांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली .हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १९ मे रोजी सकाळी ११ वा . कंधार येथे संपन्न होणार आहे. या सोहळासाठी दैनिक सामनाचे संपादक तथा खासदार संजय राऊत, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व सिनेअभिनेता सयाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त पत्रकारांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राज्यातील व नांदेड जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकारांचा सन्मान व्हावा या उद्देशाने कै. दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठान व हिंदवी बाणा लाईव्ह च्या संयुक्त विद्यमानाने गेल्या चार वर्षापासून पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन केले होते.

या आवाहनाला पत्रकारांनी भरभरून प्रतिसाद देत प्रस्ताव पाठवले होते. प्रस्तावाची छाननी करून पुरस्कार १ जानेवारी २०२३ रोजी जाहीर करण्यात आले . यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय पुरस्कार स्टेट न्युज महाराष्ट्र tvचे संपादक विलास आठवले यांना तर बाळशास्त्री जांभेकर मराठवाडा भूषण पत्रकारिता पुरस्कार लोकपत्रचे संपादक रवींद्र तहकीक यांना जाहीर करण्यात आला आहे. २०२२ च्या सामाजिक कार्यात अभिनेते सयाजी शिंदे यांचे मोठे योगदान असल्याने या वर्षीचा संत गाडगे बाबा सामाजिक पुरस्कार सयाजी शिंदे त्यांना जाहीर करण्यात आला. तसेच नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील एका पत्रकाराला मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला जाणार आहे.

# वाऱ्यासह गारपीट; खान्देशात सव्वा दोनशे मेंढ्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे दिनांक २/५/२३ रोजी मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा या काव्यपंक्तीची आठवण व्हावी असे विदारक दृष्य आज सोमवारी सोनाळा फाट्यावर मेंढपाळांच्या वाड्यावर अनुभवास आले. पहूरसह परिसरात गेल्या पाच ते सहा दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी गारपीट व वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाच्या तडाख्यात परिसरातील जामनेर मार्गावरील सोनाळा फाट्याजवळ नांदगाव येथून आलेल्या शेतात बसलेल्या मेंढपाळांच्या सुमारे १३५ मेंढ्या गारपीटीच्या तडाख्यात मृत्युमुखी पडल्या असून ७५ मेंढ्या धरणात वाहून गेल्याचे सांगण्यात आले.

गेल्या पाच ते सहा दिवसापांसून परिसरात तसेच पिंपळगाव गोलाईत शिवारात खोकर तळा या ठिकाणी शेतकरी देवराज राजाराम पाटील, यांच्या शेतात बानगाव तालुका नांदगाव जिल्हा नाशिक येथील भगवान सदाशिव गोळेकर, सिताराम सदाशिव गोळेकर, प्रल्हाद सदाशिव गोळेकर, शांताराम सदाशिव गोळेकर, अरुण सदाशिव गोळेकर, पंकज सदाशिव गोळेकर या सहा मेंढपाळ बांधवांचे असून काल सायंकाळी सात ते साडेसात वाजेच्या सुमारास अचानक आलेल्या गारपीट चक्रीवादळ व अवकाळी पावसाच्या तडाख्यात त्यांच्या वाड्यातील ८००ते ९००मेंढ्या असून त्यापैकी १३५ मेंढ्या गारपिटीच्या तडाख्यात मृत्युमुखी झाल्या तर ७५ मेंढ्या शेजारी असलेल्या नाल्यातून वाहून गेल्याचे सांगण्यात आले असे एकूण ३०ते ३५लाखांचे नुकसान झाल्याचे भगवान गोळेकर या मेंढपाळ बांधवाने सांगितले. यावेळी सोनाळा येथील आपत्कालीन कार्यकर्ते सागर पाटील, अमोल सुरसे, प्रशिक इंगळे, तुषार पगारे , प्रशांत पाटील , तेजस पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी मेंढपाळ बांधवांसह मेंढ्यांचा जीव वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले . दीडशे ते दोनशे मेंढ्यांचे प्राण वाचविण्यात त्यांना यश आले ,दरम्यान या मेंढपाळांचा काल सायंकाळपासून ते आज सायंकाळपर्यंत तब्बल २४ तासात त्यांचा संसार पूर्णपणे उध्वस्त झाला असून यात त्यांचे घरातील सर्व खाण्यापिण्याच्या साहित्यासह संसार उपयोगी वस्तू या सर्व वाहून गेल्या त्यामुळे आज त्यांचा संसार उध्वस्त झाला असून पहूर तसेच सोनाळा परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना खाण्यापिण्याची व्यवस्था करून जेवणाची व्यवस्था केली यात प्रामुख्याने माजी जिल्हा परिषद सदस्य राजधर पांढरे, पत्रकार गणेश पांढरे, सरपंचपती रामेश्वर पाटील, पिंपळगाव गोलाईतचे सरपंच संदीप पाटील यांनी जेवणाची नाश्त्याची आणि पाण्याची तातडीने व्यवस्था करून त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. घटनास्थळी सोनाळा येथील तलाठी धीरज जैन, पहुर येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.जयलाल राठोड जळगाव जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सदाशिव शिसोदे, तहसीलदार अरुण शेवाळे यांनी तातडीने मेंढ्यांचे शवविच्छेदन करून पंचनामा केला. घटनास्थळी नामदार गिरीश महाजन जिल्हाधिकारी, अमित मित्तल यांनी घटनास्थळाची पाहणी करून मेंढपाळ बांधवांची तसेच मृत्युमुखी पडलेल्या मेंढ्यांची पाहणी करून आमदार गिरीश महाजन यांनी सांगितले की या सर्व पंचनामे करून शासकीय स्तरावर गारपीटीच्या तडाख्यात मृत्युमुखी पडलेल्या प्रतिमेंढी चार हजार रुपये अनुदान तात्काळ देण्यात येणार असल्याचे सांगितले. १०० पेक्षा जास्त विजेचे खांब तसेच विद्युत रोहित कोसळल्याने पाऊस परिसरातील २० पुरवठा काल सायंकाळपासून आतापर्यंत वीस पुरवठा खंडित झाला आहे दुरुस्तीसाठी महावितरणचे कर्मचारी युद्ध पातळीवर प्रयत्न करीत असून त्यांना जनतेने सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे एटीएम सुविधा, पीठ गिरण्या, झेरॉक्स तसेच पिण्याचे पाणी इंटरनेट सुविधा आदी सेवा विस्कळीत झाल्या आहेत.



येत्या तीन ते चार दिवसात पहुरसह परिसरातील सर्व नुकसान झालेल्या शेतीचे पिकांचे तसेच घरांची पडझड झालेल्या या सर्वांचे पंचनामे येत्या तीन ते चार दिवसात पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले, तसेच सर्वांना शासन स्तरावर मदत मिळवून देण्याचे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले . पहूर पेठ येथील प्रगतीची शेतकरी साहेबराव देशमुख, चरण पाटील, यांच्या केळीच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून विजय भागवत पाटील या शेतकऱ्यांचे ही घरावरील पत्रे उडाल्याने घरात असलेल्या कपाशीचे प्रचंड नुकसान झाले गाव परिसरात अनेक ठिकाणी मका कपाशी , भाजीपाला यांचे अतोनात नुकसान झाले आहे याच प्रामुख्याने सर्वाधिक नुकसान मका, केळी, ज्वारी, बाजरी ,टरबूज यासह भाजीपाला पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे तसेच अनेक घरांची दुकानांची पडझड झाल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत .

महाराष्ट्र Business Katta












# पंचमीचा तमाशा...!



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**लोककला ही महाराष्ट्राचे सांस्कृतिक वारसा आहे. लोक कलेच्या माध्यमातून प्रबोधन तर होतेच त्याशिवाय मनोरंजन ही होते. अशीच लोक कला जोपासणारे मुस्लिम समाजाचे औरंगाबाद जिल्ह्यातील टाकळी येथील नवाब-महंमद टाकळीकर तमाशा मंडळ यांनी ही कला जोपासलेली आहे. नवाब-महंमद यांचा तमाशा हा औरंगाबादच्या पश्चिमेच्या तालुक्यात,पंचमीचे कार्यक्रम बाजारसावंगी,दरेगांव,पाडळी, सोबलगाव, खंडाळा, सायगाव, लासूर स्टेशन, मनुर, देभेगाव, वासडी, निंभोरा, सांजुळ, उमरावती, आंबेलोहळ,कमळापूर या ठिकाणी होत असे.**

तसेच नाशिक, धुळे, जळगाव ( खानदेश ) म्हणजे जळगाव व धुळे या भागात हा तमाशा प्रसिध्द होता. तसे नवाब आणि महंमद हे दोन सख्खे भाऊ असून नवाब तमाशात स्त्रीचा वेष परिधान करून नाचकाम व तमाशात स्त्री ची भुमिका करायचा, तर महंमद हा नायकाची भूमिका करून गायन व हार्मोनियम ( पायपेटी ) या वादयांची कामे करायचा. नवीन चित्रपट गीतावर नवाब-महंमद नाचकाम करायचे. महंमद चित्रपटातील नटाचे वस्त्र परिधान करून नवाब बरोबर नायकाचे काम करायचा. दोघेजण हुबेहुब चित्रपटातील नटनटीप्रमाणे नाच काम करायचे. या त्यांच्या नाचकामाने प्रेक्षकांना भुरळ पडायची आणि माझ्याकडे वादयकामाची जवाबदारी असायची. मी एकाच वेळी तीन-तीन वादये वाजवीत असे. त्यात प्रामुख्याने हार्मोनियम, इलेक्ट्रीकल ऑरगन आणि माझ्या मांडीवर बँजो ( बुलबुल तरंग ) मी वाजवायचो. बबन ढोलकी वाजवायचा तर पाखरे मामा तबल्यावर साथ करायचे, आणि रंगी-बेरंगी लाईटींगवर नाचण्याची दृश्ये व संगीत प्रत्येक प्रेक्षकाना भुरळ पाडीत असे. हा तमाशा पाहण्यासाठी पुरूषांप्रमाणे महिलाही उत्सुकतेने पाहत. कारण हा तमाशा उघडयावर असायचा.

धरलेल्या सुपाऱ्यावर प्रत्येक गावात पाच-पाच दिवसाचे तमाशााचे कार्यक्रम व्हायचे. यामध्ये स्त्रीच्या भूमिकेत नाच्याचे काम करणारे हनमंतखेडयाचा धोंडीराम नाच्या, रमेश नाच्या, गण्या नाच्या, उमरावतीचा नय्युम नाच्या, आणि सर्वात छोटा लक्ष्मण नाच्या व स्वतः फडमालक नवाब हे नाच काम करायचे.यांचे काळेभोर केसं लांब वाढलेले असायचे. त्यावर दिवसा हे कलाकार दस्ती अथवा रूमाल डोक्याला बांधायचे. सोंगाड्याची विनोदी भूमिका करणारे आसाराम पाटील ठोंबरे जळगावकर ता. कन्नड जि. औरंगाबाद आणि कैलास जाधव बिडकीनकर ता. पैठण हे असत. खलनायक म्हणून रामभाऊ तर नायक हा महंमद भूमिका करायचा. वगातील छोटी-मोठी साधु-संताची भूमिका पाखरेमामा करायचे. वग संपेपर्यंत बबनवर व माझ्यावर संगीत देण्याची जवाबदारी असे. आम्हाला सुरत्या ( झिलकारी ) म्हणून मल्हारीभाऊ तुणतुणे ( चोंडकं ) वाजवायचे. लाईटींगची देखभाल करणारा एखादा तात्पुरता वायरमेन असायचा व त्याला दोन -तीन बिगारी काम करणारी मुले सोबत असायची. असा हा २० कलावंतांचा नवाब-महंमद टाकळीकर तमाशा मंडळ असायचा. स्वतःच्या मालकीचा टाटा टेम्पो हे वाहन असायचे आणि विशेषतः महंमद हा औरंगाबादच्या महानगर पालिकेत नोकरीला होता. तो सकाळी स्वच्छतेची नोकरी करायचा आणि संध्याकाळी ज्या गावात पंचमीच्या तमाशांचा कार्यक्रम असेल तेव्हा तो मला औरंगाबादच्या मच्छली खडक या बँन्डबाज्याच्या आखाड्यावरून सोबत घेऊन मोटारसायकलीवर नेण्यासाठी यायचा . त्याकाळात मी बँन्डबाज्यामध्ये बँन्ड वाजविण्याचे काम करुन महाविद्यालयीन शिक्षण घेत होतो, आणि आम्ही दोघे ज्या गावी जवळपास तमाशाचा कार्यक्रम असेल तिथे मात्र वेळेवर जायचो. मध्यान्हरात्र झाली की, चंद्र माथ्यावरून कलल्यावर हलगी-ढोलकीच्या कडकडात व तुणतुणे च्या आकर्षक जुगलबंदी चलायची आणि शीतल वातावरणात कानावर घडकायची. तमाशा रेणूकामातेच्या मंदिराशेजारी भव्य व्यासपीठावर उभा राहयाचा. हालगी -ढोलकीच्या नाजूक आवाजाने प्रेक्षकांना भुरळ पडे. वादयांच्या ठेक्यातले वादयकाम तोडा झाल्यावर गणाला सुरूवात व्हायची.उंचेला रामभाऊ, नवाब- महंमद, नाकेला ही फडकर्ती मंडळी चांगल्या तालासुरात गण गायची. नंतर ढोलकीच्या तालावर



पायात चाळ बांधलेले धोंड्या नाच्यासह सर्व नाचे पाय आपटीत दोन्ही हातांनी शिडीसारखा पदर धरून पाठमोऱ्या चार-पाच नाचे पुढे यायचे अणि हालगी-ढोलकीच्या तालावर नाचायला सुरुवात करायचे. त्यात भलताच रंग भरला जायचा. सर्व नाच्यांनी रंगदार व ढंगदार नाच करून सर्व रसिकांच्या मनाला घायाळ करून टाकायचे. नंतर सर्व गवळणी दही-दूध घेऊन विकण्यासाठी मथुरेच्या बाजाराला निघायच्या. या सर्व नाच्या गवळणी बरोबर विनोदी सोंगाडया म्हणून मावशी बरोबर असायची. रस्त्यामध्ये कृष्णा आणि सुदामा त्यांची वाट आडवायचे. मग त्यांच्यात समझोता होऊन प्रत्येक गवळणीने कृष्णाची विनवणीच्या स्वरूपात गौळण गाऊन नाचकाम करायचे, यामध्ये मावशी आणी कृष्णाची विनोदी जुगलबंदी चाले, आणि सर्वात शेवटी श्रीकृष्णाची सामुहिक गौळण सादर होई. या गौळणीत सर्व नाचे सामुहिक व शिस्तबध्द नाचकाम करून गोड आवाजात रसिकांचे संगीतमय मनोरंजन करीत. नंतर वगाचे नाव जाहीर होऊन त्यामध्ये काम करणाऱ्या कलाकारांचे नाव आणि भूमिका जाहीर होई. तसेच जाहीर झालेल्या वगाची नांदी गायली जाई. तो पर्यंत रंगमंचामध्ये फक्त पडदयावर रंगीत लाईट हा चालू-बंद होई, आणि यावेळी वगनाटयात काम करणारे कलावंत व त्यांची भूमिकाही जाहीर होई. नंतर प्रत्यक्ष वगनाटयाला सुरूवात होऊन रसिक शांततेने ते वगातील संवाद ऐकत असत. नवाब महंमदच्या तमाशातील गाजलेले वगनाटय, " राजा हरिश्चंद्र राणी तारामती, भक्त पुंडलिक, सरपंच खुनी, पाटील बेईमानी, काठेवाडीचा खून खटला, सख्खे भाऊ, पक्के वैरी, एक बाई तिघांची घाई," अशा धार्मिक, सामाजिक,कौंटबिक, राजकीय अशा वगनाटयाचे प्रभावीपणे सादरीकरण होई.

गण- गौळण संपल्यावर पडदयामागे गावकऱ्यांच्यावतीने व तेथील कार्यकर्ते यांच्यावतीनेही दोन-तीन वेळा चहा येई. त्यातला त्यात लहान लक्ष्मण नाच्या हा वयाने तसा तो चौदा- पंधरा वर्षाचा असेल पण रंगाने चांगला उजळ उठावदार बांध्याने शेलाटी, नाकी डोळी, नीटसं होता. अंगात गंजीफ्राक व त्यावर लोंबण चकचकता, काळ्या गोफांचा दोरा मलमली धोतरांचा सोगा, उजव्या खांदयावर टाकून हातात डांळीबी रंगाच्या पटक्याची घडी घेऊन रंगमंचावर येत असे. येता-येता आपले लांबसडक काळेभोर केसं मागे-पुढे हेलकावीत हवेत उडून रंगमंचावर गाणे म्हणायचा. तशी तरणीबांड पोरे त्याच्यावर फिदा होऊन टाळ्या वाजवायचे. राजा हरीश्चंद्र राणी तारामती या वगनाट्याची सुरूवात होई. तसे हे वगनाट्य धार्मिक, पण प्रेक्षक कंटाळवाणे होऊ नये म्हणून दोन- तीन सिनेमातील नवीन- जुनी गाणे, व लावणी, सवाल-जवाबाची गाणी होई. यामध्ये वगाचे भावकाम करणारे भावकाम म्हणजे भावनीक पात्र करणारे अस्सल व जातीवंत कलाकार आपल्या दर्जेदार भूमिका करून स्वतः भावुक होऊन करीत असल्याने तसतसे महिला व पुरुष त्यांची भावकाम बघून कुणी-कुणी डोळेही पुसत. अख्खी रात्र वगनाटय चालायचे. वगाचे भावकाम पाहून आणि तितक्याच विनोदी शैलीतल्या सोंगाड्यांचे विनोद ऐकूण प्रेक्षकांची हसता-हसता पोट दुखायची वेळ येत असे, आणि पुन्हा भावीककाम सुरु होई. म्हणजे करूणरस व हास्यरस यांचा सुरेख संगम साधला जाई. हे वगाचे भावकाम तल्लीन होऊन बसलेल्या ग्रामीण रसिकांना एका बाजूला दिवस उगवलेला लवकर कळतही नसे. असे हे पंचमी उत्सवाचे पाच दिवस कार्यक्रम आटोपून, सुपारीचे मानधन घेऊन तमाशाा फड पुन्हा दुसऱ्या गावच्या पंचमी यात्रेला जात असे. तमाशााच्या गाडीला वाटे लावण्यास आलेली गावातली सर्व लहान- थोर मंडळी मोठया प्रेमाने तमाशा फडाला वाटे लावीत असे, व पुढच्या वर्षाच्या पंचमीला मात्र तुम्हीच यावे. ही विनंती करीत असे.

# धर्माच्या नावाखाली अतिरेक आयुष्य उद्ध्वस्त करत आहे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**धर्माच्या नावाखाली आपण काय करत आहोत याचे भाणही लोकांना राहले नाही. धर्माचा आधार घेऊन अतार्किक, काल्पनीक, अंधश्रद्धाळू व पाखंडी बाबींना चालना देऊन भोंदुगीरी करणाऱ्या लोकांना उच्च स्थान देऊन लाखो रूपये त्याला दिले जातात. धर्मामुळे जर माणुस अंधश्रद्धा, विषमता, पाखंड जगवून भोंदुला मोठे करत असतील आणि सत्य, तर्क व विज्ञान यांना नाकारून बोंदुलोकांच्या गोडगोड गोष्टीला भुलून धर्माच्या, व भक्तीच्या नावाखाली अतिरेक करत असाल तर ते गुलामीचे लक्षण आहे.**

अडाणी व पाखंडी लोक बुद्धी, तर्क व विज्ञानाला न पटणाऱ्या गोष्टी सांगुन लाखों रुपये घेऊन जातो. पैसे देणारे लोक धर्माचे काम आहे म्हणतात परंतु पैसे घेणाऱ्याला माहिती असते आपण ज्याचे पैसे घेतो तो धर्म नाही तर धंदा आहे. माणसाला सर्वांगीण विकसित व्हायचे असेल तर विज्ञाननिष्ठ शिक्षण आवश्यक आहे. तरच माणुस बौद्धिक व सामाजिक विकसित होऊ शकतो. फक्त अक्षरे वाचता येणे म्हणजे शिक्षण नाही तर वाचलेली अक्षरे समजून घेऊन ते तर्क, विज्ञान व सत्य यावर तपासून बघणे आवश्यक आहे. परंतु धर्माच्या नावाखाली धर्माची भक्ती करताना मेंदू गहाण ठेवावा लागतो. मेंदु गहाण असल्याने तर्क विज्ञान व वास्तव पायदळी तुडवुन अंधश्रद्धा पोसली जाते. आज गावची परिस्थिती बघितली तर भव्य दिव्य मंदिराचे निर्माण गावामध्ये केलेले दिसून येते. मंदिर आलं म्हणेज सकाळ संध्याकाळी किमान दोन वेळा आरती. काही ठिकाणी सोमवार, गुरूवार व शनिवार हे दिवस विशेष असतात. मंदीराच्या व धर्माच्या नावाखाली वेगवेगळे सप्ताह, हरिपाट, शिवपुराण, अशा प्रकारचे काही ना काही कार्यक्रम सुरुच असतात. सकाळी झोपेतून उठायच्या अगोदर पासून तर झोपेपर्यंत धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा व काल्पनिक अतार्किक गोष्टी डोक्यात पेरल्या जातात. जागृत व विज्ञाननिष्ठ व्यक्तीने त्याला विरोध केला तर त्याला धर्मद्रोही म्हणून जाहीर केले जाते. बहुतांश गावात सध्या दररोज धार्मिक कार्यक्रम होताना दिसत आहेत. धर्म ही वैयक्तिक बाब आहे. परंतू धर्माच्या उपासनेचा व धर्माच्या आचरणाचा जर माणसालाच त्रास होत असेल तर तो धर्म काय कामाचा ? गावागावात मोठ मोठे मंदिर असताना मात्र शाळा डबघाईला जात आहे. येणाऱ्या पिढीचे भविष्य ठरवणाऱ्या शाळा डबघाईस जाताना मात्र संत महापुरुषांच्या विचाराच्या विरोधात जाऊन शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मंदीराकडे वळवले जात आहे. ज्ञान पेरण्याच्या वयात अज्ञान पेरले जात आहे. हि खुप घातक बाब आहे. प्रत्येकाला धर्माचे आचरण करण्याचा अधिकार आहे. गावामध्ये अनेक धर्माचे लोक राहतात. मग प्रत्येकांचे ठरवले आम्ही वर्षभर मोठमोठे भोंगे लाऊन धर्माची उपासना करतो तर दैनंदिन जिवन विस्कळीत होईल. मंदीरावर वर्षे भर कार्यक्रम चालतात. भोंग्याचा त्रास होणाऱ्या लोकांना



मंदीरावरील कर्णकर्कश आवाज व कीर्तनातून महिलेचा होणारा अवमान आपुलकीचा वाटतो. एकही किर्तनकार किंवा कथा वाचक महिलांचा सन्मान करताना दिसत नाही. प्रत्येक जन महिलांचा स्वभाव, चरित्र, राहणीमान यावरून अवमान करतच असतो परंतु याची जाणीव मेंदू बंद पडलेल्या लोकांना नाही. धर्माची उपासना ही घराच्या आत व्हायला पाहिजे. परंतु गावभर आवाजाचा त्रास निर्माण करून दहाच्या नंतरही अनेक गावात सप्ताह, पुराण व कथा वाचन होते. गावामध्ये विद्यार्थी असतात त्यांना अभ्यासाचा त्रास होतो याची जाणीव लोकांना राहत नाही. आवाजाची तिव्रता तर एवढी असते की गावाच्या एका कडेला सुरू असलेल्या कार्यक्रमामुळे गावाच्या दुसऱ्या टोकाला त्रास होतो. दोन व्यक्ती शांतपणे बोलु शकत नाही एवढा मोठा आवाज. गावामध्ये वृद्ध लोक असतात त्यांना त्रास होतो, गावामध्ये आजारी लोक असतात त्यांनी ही त्रास होतो. सकाळ सांयकाळ गावातील लोकांना काही महत्त्वाचे फोन असतात, बऱ्याच तरुणांचे ऑनलाइन काम असल्याने व्हिडीओ कॉन्फरन्स असतात त्यांना त्रास होतो. गावातील बालक, विद्यार्थी, वृद्ध, तरुण, आजारी व्यक्ती सर्वांना आवाजाचा त्रास होतो तरीही थोडाही आवाज कमी होत नाही. आवाज कमी करा किंवा सलग वर्षभर गावाला जागवून कार्यक्रम घेऊ नका बोलणाऱ्याला आरोपी च्या पिंजऱ्यात उभे केले जाते. म्हणजे यांनी मोठमोठ्या आवाजात किर्तन, आरत्या केल्या तर एकही शब्द न बोलता मेंदु गहाण ठेवून गुपचुप ऐकुन घ्यायचे हीच पध्दत पडली आहे. परंतु याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेक घटकांवर परिणाम होतो याची जाणीव राहली नाही. असे कृत्य करण्याच्या गटात निवृत्त शिक्षण ही असतात. संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांनीच जर विद्यार्थ्यांचा अभ्यास व शाळा यावर लक्ष राहणार नाही असे कार्यक्रम घेतले किंवा घेणाऱ्याला मुकसमंती दिली तर त्याला शिक्षक म्हणायचे का ? धर्माच्या नावाखाली महिन्यातून दोन भंडारे गावात केले जातात. भंडाऱ्यामध्ये गावातुनच पैसा पिठ गोळा केले जाते व देवाच्या नावाच्या भंडारा केला जातो. परंतु किर्तनाचा लाखों रुपये वाचवून शाळेला दिले जात नाहीत. किंवा दरमहिन्यात भंडारा करणाऱ्या गावात धर्मातीलच गरिब मुलींचे लग्न लाऊन दिले जात नाही. जर कमी आवाजात आरती आणि किर्तन केले तर मुलांना अभ्यास, लोकांना वैयक्तिक कामे करता येतील हे काम देवाला चांगले वाटणार नाही का ? लोकांना त्रास देऊन दररोज जोरजोरात आरती व किर्तन केले आणि लोकांना त्रास झाला तरच देवाला चांगले वाटते ? धर्मातील गोरगरीब मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण, किंवा एखाद्या चा दवाखान्याचा खर्च केला तर पुन्य मिळणार नाही का ? शिक्षण, लग्न, आरोग्य यावर खर्च केला तर देवाची सेवा होणार नाही का ? देवाला मोठमोठ्या आवाजातच ऐकु जाते का ? भंडारा देवाला, धर्माला पाहिजे की लोकांना ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. कारण धर्म वैयक्तिक बाब आहे तरीही धर्माला सार्वजनिक करून त्याचा अतिरेक होत असेल तर प्रश्न निर्माण होणारच. मुलांच्या शाळा गळक्या व मंदीरावर रोज शेकडो लोकांच्या दानाची यादी वाचली जाते. पैशाची गरज देवाला आहे का माणसाला ? धर्म असतो तरी कशासाठी ? धर्मातील लोक धर्मातील लोकांनाच मदत करत नसतील तर त्या धर्माच्या शिकवणुकिला व त्या भक्तीला काय अर्थ ? देवाची भक्तीचा अतिरेक नेमका कशासाठी ? मंदीरावरील आवाजामुळे संपूर्ण गाव त्रस्त असताना इतर धार्मिक स्थळावर जर तसे कार्यक्रम घेतले तर चालतील का ? किंवा एकाच गावात मंदिर, मशीद आणि विहारावर असे कर्णकर्कश आवाजात दररोज कार्यक्रम घेतले तर गावात शांतता राहील का ? एकाच धर्माला आचरण करण्याचा अधिकार आहे का ? बाकीच्या धर्माने आचरणाचा अधिकार वापरला तर थोडी कल्पना करून बघा काय होईल ? गावात शांतता सुव्यवस्था अबाधित राहुन विद्यार्थी, तरुण वृद्ध बालक महिला यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता धर्म सांभाळला तर जमणार नाही का ? मंदीरावरील भोंग्याच्या कर्णकर्कश आवाजामुळे व किर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, पाखंड पसरवल्या मुळे अनेक लोकांना माणसिक गुलाम बनवून त्यांचे आयुष्य उद्धस्त केले जात आहे. याचे परिणाम येणाऱ्या काळात भोगावेच लागतील.

# पहिलं बक्षीस...!



भानुदास धोत्रे
संपर्क क्र. 7972625086

आधुनिक केसरी

**कोरोनाचे दिवस नुकतेच संपले होते. गाडी हळूहळू नेमकीच रुळावर येत होती. भीत भितच का होईना, पण लोकं एकमेकात मिसळायला सुरुवात झाली होती. कोरोनाच्या त्या भयंकर आठवणी मात्र, काही केल्या लोकांच्या मनातून निघत नव्हत्या. अनेक दिवस एकमेकांपासून विलग राहिल्यामुळे माणसांना माणसांची ओढ लागली होती. एकाकीपणाचा वीट आला होता. शेवटी माणूस हा समाजशील प्राणी. तो तरी असा एकमेकांपासून किती दिवस दूर राहणार?**

एकत्र येण्याला काहीतरी निमित्त हवं होतं. म्हणून श्रेयशच्या काकांनी व बाबांनी आजोबांच्या "स्मृतिप्रित्यर्थ" आपल्याच घरी एक छोटेखानी कविसंमेलन आयोजित केलं होतं. कविसंमेलणाला शहरातले नामांकित कवी, कवयित्री यांना निमंत्रित केलं होतं. लहानग्या श्रेयशला कविसंमेलन म्हणजे नेमकं काय असतं? हे मुळीच माहित नव्हतं. पण आपल्या घरी काकांनी व बाबांनी कोणतातरी एक कार्यक्रम आयोजित केलेला आहे, आणि ह्या कार्यक्रमाला बाहेरची पाहुणे मंडळी येणार आहे. हे त्याला पक्क कळत होतं.

श्रेयची मोठी बहीण श्रेया. ती सातवीला होती. तिला बऱ्यापैकी कळत होतं. तिच्याकडून त्यानं कविसंमेलन म्हणजे काय असतं हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा त्याला कळलं की प्रत्येक कवी सर्वांसमोर बसून आपल्या स्वतःच्या एक किंवा दोन कविता गाऊन किंवा म्हणून दाखवतात आणि सामोर बसलेले रसिक श्रोते त्यांना टाळ्या वाजून, वाह...! छान....! म्हणून उस्फुर्तपणे दाद देतात. अभिप्राय देतात. संमेलणाचा निखळ आनंद लुटतात. श्रेयशची मोठी बहीण श्रेयाही या कविसंमेलनात आपलं स्वतःचं बसवलेलं एक गीत गाणार असल्याचं श्रेयशला कळलं. तेंव्हा त्यालाही वाटू लागलं की आपणही श्रेयासारखंच काहीतरी सादर केलं पाहिजे. पण नेमकं सादर तरी काय करावं? इथंच त्याची गाडी अडली होती. श्रेयश इयत्ता तीसरीत शिकत होता. त्याचं वय अवघं सात आठ वर्षाचं. एवढुश्या लहान वयात एवढ्या मोठ्या व्यासपीठावर काय सादर करावं? अन तेही एवढ्या मोठ्या जाणकार कवी कवयित्रींसमोर? श्रेयश विचाराच्या गर्तेत असतांनाच श्रेयशच्या चेहऱ्यावरील काळजी त्याच्या आईनं हेरली. काळजीबद्दल त्याला विचारलं. तेंव्हा तो आईला म्हणाला "आई आई....! श्रेयादीदी आपल्या घरी होणाऱ्या कविसंमेलनात तिनं स्वतः बसवलेलं गीत गाणार आहे. मी काय म्हणू गं ?" श्रेयशन असं विचारताच आई पटकन म्हणाली, "अरे त्यात काय अवघड? किती सोप्प आहे. कोरोना काळातील सुट्यामध्ये तू नाही का ऑनलाईन संस्कार क्लास अटेंड केला होतास, आणि त्यात रामरक्षा पाठ केली होतीस. तीच म्हण की." आईनं "रामरक्षा" सुचविल्याबरोबर श्रेयशचा चेहरा खुलला. काहीतरी हरवलेलं अचानक सापडावं, इतका मोठ्ठा आनंद त्याला झाला. त्याचवेळी पक्क ठरलं की कविसंमेलणाच्या शेवटी रामरक्षा म्हणायची.

दिलेल्या वेळेप्रमाणे सायंकाळी एकानंतर एकेक कविमहोदय घरी आले. त्यांना बसण्यासाठी खास व्यासपीठ तयार करण्यात आलं होतं. खाली गालिचा अंथरला होता. पाठीमागे लोड, तक्के व्यवस्थित मांडले होते. आजोबांच्या स्मृतीप्रित्यर्थ कविसंमेलन असल्यामुळं त्यांची प्रतिमा आणि दीपही मांडण्यात आला होता. आलेल्या कवी महोदयांचं चहापाणी, आगत स्वागत, प्रतिमापूजन, दिपप्रज्वलन झाल्यानंतर प्रत्यक्ष कवी संमेलणाला सुरुवात झाली. श्रेयशच्या घरचा वीस बाय बारा चा हॉल रसिकांनी गच्चं भरला होता. रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोरोनानंतर हा एवढ्या मोठ्या स्वरूपाचा पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम होत होता. प्रत्येक कवी कवयित्री आपापली कविता म्हणून आणि गाऊन रसिकांची दाद मिळवत होते. संमेलणाचे निवेदक आपल्या खुमासदार शैलीत संमेलनात उत्तरोत्तर रंग भरत होते. रसिक श्रोते आनंदात न्हाऊन निघत होते. टाळ्यांचा कडकडाट झडत होता.... हास्याचे फवारे उडत होते..... प्रत्येकजण आनंदात न्हाऊन निघत होता..... वाह क्या बात है.... खूप छान.... उत्तम... सुंदर..... अशी दाद रसिकांमधून कवी कवयित्री यांना मिळत होती.....बघता बघता कविसंमेलन उत्तरार्धाकडे झुकलं होतं..... श्रेयाचं गितही गाऊन झालं होतं. तिच्या गाण्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाला होता. उपस्थितांनी तिचं तोंडभरून कौतुक केलं होतं.

निवेदकानं श्रेयशचं नावं पुकारताच श्रेयश धीटपणे उठला नि व्यसपीठावर जाऊन बसला....सर्वजण चिमुकल्या श्रेयशकडे मोठ्या कुतूहलानं पाहत होते. सर्वांकडे एक कटाक्ष टाकून त्यानं रामरक्षा म्हणायला सुरुवात केली....

**|| विनियोगः ||**
**श्रीगणेशायनमः ।**
**अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य बुधकौशिक ऋषिः ।**
**श्रीसीतारामचंद्रोदेवता अनुष्टुप् छन्दः सीता शक्तिः ।**
**श्रीमद्हनुमान् कीलकम् ।**
**श्रीसीतारामचंद्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः ॥**
**॥ अथ ध्यानम् ॥**

यांप्रमाणे अगदी कुठेही न थांबता श्रेयशचं रामरक्षा पठण सुरु होतं. सर्वजण कानात प्राण ओतून रामरक्षा ऐकत होते. एवढी अवघड संस्कृतातील रामरक्षा तीसरीतला श्रेयश मोठ्या धिटाईनं खाड खाड म्हणत असलेला पाहून सर्वच कविमहोदय आणि उपस्थित सर्व रसिक थक्क होऊन गेले होते. श्रेयशनं कोरोना काळातील सक्तीच्या सुट्ट्याचा सदुपयोग म्हणून आईच्या मार्गदर्शनाखाली "ऑनलाईन संस्कार" वर्गाच्या माध्यमातून रामरक्षा पाठांतर केली होती. त्यामुळेच तो एवढ्या धिटाईन सर्वांसमक्ष रामरक्षा म्हणून दाखवत होता. एकीकडे पाठांतर ही कला लोप पावत असतांना श्रेयशनं मात्र मोठ्या मेहनतीनं ती जोपासली होती. त्यात श्रेयशच्या आईचाही सिंहाचा वाटा होता.

**राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे ।**
**सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥३८॥**
**॥इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ॥**
**॥ श्री सीतारामचंद्रार्पणमस्तु ॥**

अशारीतीने एका दमात कुठेही न थांबता, कुठेही न अडखळता श्रेयशनं रामरक्षेचा शेवट केला नि काय आश्चर्य..... उपस्थित सर्वच कवी कवयित्री महोदय जाम खुश झाले. एवढी अवघड रामरक्षा बिनचूकपणे तीही केवळ तीसरीतल्या श्रेयशनं म्हटल्यामुळे त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला. त्याला बऱ्याचजणांनी रोख स्वरूपात बक्षीसं दिली. ती रक्कम बहुदा हजाराच्याही पुढे गेली असावी. बक्षीसं देणारे हात हे काही साधेसुधे नव्हते साक्षात सरस्वतीचे साधक "कवीगण सारस्वत" होते. त्यांच्या हस्ते आयुष्यातले पहिलेच बक्षीस अन आशीर्वाद घेऊन यापुढे श्रेयशने अजून जोमाने पाठांतर करण्याचा दृढनिश्चय केला होता. ह्या पहिल्या वहिल्या बक्षीसानं श्रेयशचा आत्मविश्वास चांगलाच दुनावला होता.

# प्रसाद

आधुनिक केसरी

आपण सर्वेच कधी न कधी किंवा काही व्यक्ति तर रोज मंदिरात जातात, आणि जायला हवे. सकाळी एकदा मंदिरात जाऊंन आल्यावर दिवस खूप छान जातो. आणि काम हि सर्व व्यवस्थित पार पडतात. त्या दिवशी मी मंदिरात गेलेली, एक प्रसंग असा माझ्या सामोर घड़ला कि लिहावं वाटलं, त्यावर अशीही लोक असतात मी रोज देविच्या मंदिरात जाते तिथे महादेवाची पिंड आहे मी जस जमल तस जाते त्या दिवशी सोमवार होता मी मंदिरात गेलेली संध्याकाळची वेळ होती. माझी पूजा झाली मी आरती साठी थांबली म्हटलं आता आरती करूनच जाऊ देवीची. एक व्यक्ति पुरुष होता त्याचा उपवास होता पशुपती सोमवार त्याने त्याचे पूजाचे ताट आणले आणि शिवलिंग जवळ ठेवले इकडे देवीची आरती होण्यात आली होती. सर्वांनी आरती घेतली मग़ प्रसाद वाटप सुरु झालं. सर्वांना प्रसाद देताना त्या व्यक्तीकडे जेव्हा प्रसाद आला तेव्हा त्याने नकार दिला अन म्हणाला माझा उपवास आहे. अरे असेल तुझा उपवास पण मग़ तु घरी घेऊन जा न माझा पण उपवास होता पण मी एका प्लास्टिकच्या पिशवित प्रसाद घेतला प्रसादाचा अपमान कधी करू नये मी त्या माणसाला बोलले कश्यात तरी घ्या नकार नका देऊ तर म्हटला तुझ्याकडे पिशवी आहे माझ्याजवळ काही नाही, तसं बघायला गेलं तर ताट होतं, त्यात ठेऊ शकत होता तो पण त्यानं प्रसाद घेतला नाही. अरे काय उपयोग तुमचा पूजा करून तुम्ही प्रसादाचा चक्क अपमान करत आहात काही वेळेस लोकांना कुठे कसं वागावं ते सुद्धा कळत नाही अरे ज्या मंदिरात तुम्ही सोमवारी का असेना जाताय दोघ वेळी तरी तुम्ही जे मंदिर त्या देविच आहे तिचा प्रसाद घेत नाही तर इथेच तुम्ही चुकत आहात अरे प्रसाद म्हणजे प्र - प्रभु, सा - साक्षात्, द-दर्शन देव तुम्हाला दर्शन द्यायला आलाय. अन तुम्ही पाठ फिरवताय जाऊ नका मंदिरात घरीच बसा मी तर असच म्हनेल मग़ कितीही देव देव करा उपयोग नाही. आपलं कर्म आचरण सांभाळायला हव माणसाचं देवाच्या पूजे बरोबरच आपलं कर्मावऱ पण तेवढच लक्ष असायला हव...वाइट कर्म आपल्या हातुन घड़ता कामा नये.



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

# आम्हालाही शिकायचंय : कोण शिकवणार ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**वय वर्ष सहा ते चौदा. अचानक मी त्या मुलांना पाहिलं. काहींचे वडील मरण पावले होते अकाली. काहींच्या वडीलांचा पत्ताच नव्हता. त्यांना आई होती. त्या बहुतेक सत्तावीस अठ्ठावीस वर्षाच्या. भीक मागत होती ती मुलं. तीनचार भाऊबहीण होते. काहि बहिणींच्या कडेवर लहानसं बाळ. अस्ताव्यस्त केस होते. कपडे मळकट होते. नजर आशेची होती. मी गाडीनं चाललो होतो. अचानक ती मुलगी माझ्यासमोर आली. तिनं हात पसरला व म्हणाली, "एक दोन रुपये द्या ना. भूक फार लागली आहे."**

ते शब्द........ते शब्द कुणालाही दया आणणारे होते. कुतूहलानं मी गाडी रस्त्याच्या कडेला लावली व म्हटलं, "मी देणार पैसे. एकदोन नाही जास्त देणार. परंतू माझ्या प्रश्नाचं उत्तर द्याल काय?" "आम्हाला वेळ नाही." तो त्यांचा प्रश्न...... तो त्यांचा प्रश्न. त्या प्रश्नावर उत्तर देत मी म्हटलं,

"मी तुम्हा सर्वांना जेवणही देणार. परंतू माझ्या प्रश्नांचं उत्तर द्या."

"विचारा. तुमचा प्रश्न विचारा. परंतू लवकर विचारा."

ती मोठी मुलगी. ती मुलगी म्हणाली. तसा मी भराभर माझे प्रश्न विचारु लागलो व तिही मला भराभर आपली उत्तरं देवू लागली. माझे प्रश्न होते.

"तुम्ही भीक का बरं मागता?"

"काय करणार. उपाय नाय."

"का बरं?" "आमचं पोट भरत नाय."

"का बरं? वडील काय करतात?"

"..........." तसं विचारताच ती मुलगी इकडं तिकडं पाहू लागली. बहुतेक तिला वडील म्हटलेलं समजलं नसावं. तसं समजून मीच म्हटलं, "तुमचा बाप काय करतो?"

तो माझा प्रश्न. तसं तिनं डोळ्यातून अश्रू काढले. तसा मी म्हणालो, "काय झालं?" "काय नाय." ती मुलगी अश्रू पुसत म्हणाली. "आम्हाला बाप नाय." तिचं ते उत्तर. मला अतिशय वाईट वाटत होतं. तसा मी तरी काय करणार होतो त्यांच्यासाठी. फक्त प्रश्नच विचारु शकत होतो. बाकी काही नाही. त्यात त्या मुलीचा दोष नव्हता. तसा मी पुन्हा प्रश्न विचारला.

"किती भाऊबहीण आहात?" "पाच. पाच भाऊबहीण."

माझा प्रश्न. तसं तिचं उत्तर ऐकून सुन्नं वाटलं. पाच. पाच भाऊबहीण. तसं ऐकताच सुन्न वाटणारच. कारण त्यांची आई काही तेवढी मोठी वाटत नव्हती. ती अगदी लहानच वाटत होती. बहुतेक तो बालविवाह असावा. तसा मी पुन्हा एक प्रश्न विचारला,

"किती बहिणी अन् किती भाऊ?"

"आम्ही बहिणी चार. हा मा भाऊ शेवटचा." ती लहान मुलं. अगदी माझ्या प्रश्नांचं उत्तर निर्भीयतेनं देत होती. तसे मी त्या मुलीवर दया दाखवून शंभर रुपये दिले व शेवटचा प्रश्न विचारला, "बेटा, शाळेत जाता काय?"

"नाय." "का बरं?" "आई, शिकवत नाय. कोण शिकवणार?" तुमची शिकायची इच्छा आहे का?"

"होय." तो माझा शेवटचा प्रश्न. त्यातच त्या मुलीचं उत्तर. आम्हालाही शिकायचंय. परंतू आई शिकवत नाही आणि ती आई तरी कशी शिकवणार. तिच्यावरच भीक मागण्याची वेळ. ती साधं आपल्या बाळांना जेवनच पुरवू शकत नाही. मग शिक्षण दूरच. ती मुलगी शिकू शकत नव्हती. ना तिचे भाऊबहीण. त्यात त्या मुलांचा दोष नव्हता. दोष होता तो त्यांच्या मायबापाचा. परंतू ते तरी काय करणार. त्यात दोष त्यांचाही नव्हता तर दोष होता त्यांच्यातील शिक्षणाचा. कारण ते शिकलेले नव्हते. त्यामुळंच गरज लक्षात न घेता त्या मायबापानं एवढी मुलं जन्मास घातली होती. मी तिला पैसे दिले व निघून गेलो. परंतू माझ्या मनात ते प्रश्न तसेच बोलके राहिले. त्याची उत्तरं मलाही कधीकधी सुन्न करुन सोडतात.

मी पैसे दिले त्या मुलीला. ती माझी चूकच होती. कारण असे पैसे दिल्यानं मुलांना सवय पडते. त्यातच मायबापांनाही वाटते की आम्ही कितीही मुलं पैदा केले तरी आमचं काही कमी होत नाही. आमचं व आमच्या मुलांचं पोट भरतं. म्हणून अशी कुटूंब अनेक मुलं जन्मास घालत असतात.

आज विचार येतो की भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य मिळून आज ७६ वर्ष झालीत. परंतू ख-या अर्थानं देशाचा विकास झाला काय तर याचं उत्तर नाही असंच येतं. आज भारत विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. देश अवकाशातच नाही तर मंगळावरही पोहोचला आहे. सरकार म्हणतं की देशात गरीबी नाही. कशी दिसणार. कारण ज्यावेळेस सरकारचे देशपातळीवरील नेते जिल्हास्तरावर भेटीस येतात. तेव्हा स्थानिक नेते तेथील रस्ते सुशोभीत करतात. तसेच इतरही देश म्हणतात की भारत एक विकसीत देश असून सुसंपन्न देश आहे आणि तेही म्हणणारच. कारण ज्यावेळेस ते येतात. तेव्हा याच देशातील सामान्य प्रशासन विभागाद्वारे रस्ते सुशोभीकरण केलं जातं. नालेही कापडानं झाकली जातात. तशाच भिंतीही रंगवल्या जातात.

महत्वाचं सांगायचं म्हणजे आजही आपल्या देशाला जगात सुसंपन्न समजलं जातं. परंतू या देशातील सामान्य लोकांकडे पाहिल्यास ख-या स्वरुपात देश सुसंपन्न दिसतो काय? याचं उत्तर नाही असंच येईल. कारण देशात आजही विश्वकोटीचं दारिद्र्य आहे. परंतू दारिद्र्य का आहे याचा विचार आपण करीत नाही. आपल्याला माहीत आहे की देश स्वतंत्र झाला व कायदे बनले. देश कायद्यानुसार चालतो. परंतू खरंच जे कायद्यानुसार चालत नाहीत. त्यांच्यावर आजही देशातील प्रशासन विभागाचे लक्ष आहे कायदेशीर? याचेही उत्तर नाही. आज देशात विश्वकोटीचे दारिद्र्य तर आहेच, व्यतिरीक्त शिक्षणाचा अभावही आहे. आज याच शिक्षणाच्या अभावानं काही काही परिवारात विवाह होतो तो बालवयातच आणि मुलंही जन्मास घातली जातात बालवयातच. किती मुलं जन्मास घालावी याची मर्यादा पण नाही. तसं पाहता आजही काही काही कुटूंबात मुलगी नकोच म्हणतात. मुलाच्या जन्मासाठी अनेक मुली जन्मास घातल्या जातात. काही काही परिवारात तर मुलांचा जन्म होवूनही मुलं जन्मास घातली जातात. काही काही महाभाग तर दोष धर्माला देत म्हणतात की मुस्लिम लोकं मुलांना अल्लाची देण मानून मुलं जन्मास घालतात. कुटुंबनियोजन करीत नाहीत. परंतू जे बोलतात त्यांना कळत नाही की आपली चार बोटंही आपल्याकडंच आहेत. आज मुस्लिम समुदाय जरी मुलांना अल्लाची देण समजत असले तरी बरीचसे मुस्लिम लोकं आज सुधारले आहेत. तेही कुटूंब नियोजन मानतात. परंतू जे त्यांना दोष देतात. त्यांच्या धर्मातही आज काय दिसते? आजही त्यांच्या समाजात कुटूंब नियोजनाचा अभाव दिसतो. आजही बालवयातच बालविवाह होतो. अशी बालविवाह करणारी बरीचशी कुटूंबं आहेत. अन् अशी बरीचशी कुटूंबं देशात आहेत की जी कुटूंब नियोजन न करता अनेक मुलं जन्मास घालतात. त्यांना कुटूंब नियोजन समजावून सांगीतलं तर म्हणतात की ती आमची मुलं. आम्हाला पोसायचा नेट नाही लागत. मग तुम्हाला का वाटावू असं. बरोबर आहे त्यांचं. परंतू देशाला त्यांची मुलं पोसायचा नेट लागतो. ते कोण समजून घेणार? त्यातच मुलं तर आजही एवढी



जन्मास घातली जातात की एकाला चड्डी मिळत असते घालायला आणि दुस-याला बनियान. लहान मुलं तर नग्नच असतात बाराही महिने. अशी मुलं........त्यांच्या शिक्षणाबाबत सांगायचं झाल्यास त्यांच्यात शिक्षणाचा अभाव आहे. शिक्षणाला वाघिणीचं दूध म्हटलं जातं. ते प्यायल्यावर गुरगुरणार. परंतू ते दूध प्राशन करतील तेव्हा ना. कारण बरीचशी अशी कुटूंब देशात आहेत की त्यांचं पिढीजात तेच ते पिढीजात जगणं सुरु आहे. बालविवाह, मुलं जास्तीत जास्त पैदा करणं. त्यांना भीक मागायला लावणं. त्यातूनच कसंतरी जगवणं. शिक्षण अजिबात न शिकवणं. मुली पैदा होत असल्यास भ्रूणहत्या करणं. मुलांच्या जन्माचा उत्सव मानणं. मग लोकसंख्या वाढो वा काहीही होवो. त्यांना यात काहीही घेणंदेणं नाही. कारण त्यांना काहीच फरक पडत नाही.

त्यांची विचारशक्तीच मरण पावलेली असते. त्यांच्या जीवनात मुलांना कसं पोसावं? कसं वाढवावं? शिक्षण शिकवावं की नाही? या गोष्टीचं काही महत्व नाही. फक्त मुलं जन्मास घालणं एवढंच जाणतात ते. संस्कार अजिबात नाही त्यांच्या जीवनात. मग एक मुलगा मेला काय अन् जीवंत राहिला काय? याचंही महत्व नाही त्यांच्या जीवनात. समजा प्रकृती बिघडलीच तर ते दवाखान्यात जात नाहीत. ते त्या भोंदू वैद्यूकडं जातात. तो तात्पुरती जडीबुटी देतो. त्यावर काही किरकोळ आजार बरे होतात. परंतू काही आजार गंभीर स्वरुपाचे असतात. ते बरे होत नाही व प्रसंगी त्यात ते मरण पावतात. अगदी अकालीच मरण पावतात काही काही लोकं. तसंच ते अनेक मुलं जन्मास घालत असल्यानं आपल्या मागे मरणानंतर अनेक सोडतात. जे नाईलाजास्तव रस्त्यारस्त्यावर भीक मागून कसेतरी जगतात. त्यांच्यातही शिक्षणाचा अभाव असल्यानं तेही पुढं तसंच अल्पवयात विवाह करुन मोकळे होतात. मुलं जन्मास घालणं ठीक आहे. प्रत्येकानं मुलं जन्मास घालावी. तो त्यांचा प्रदत्त अधिकार आहे. परंतू त्यात काही मर्यादा आहे की नाही. मुलं तरुणपण आहे तेव्हापर्यंत अमर्याद जन्मास घातली जावू शकतात. परंतू त्यासाठी देशाचा विचार व्हावा की नाही. कारण आज देशाची लोकसंख्या अधिक आहे. त्यामानानं राहण्यासाठी लागणारी जमीन कमी आहे. अन्नधान्य आहे. परंतू ते तेवढंच कमी आहे. त्यामुळंच लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून विचार करुन लोकांचे पोट पालवत असतांना वा त्या लोकांसाठी सर्वच प्रकारच्या सोई करीत असतांना देशाला कित्येक कोटी रुपयाचं कर्ज घ्यावं लागतं. याचाही विचार होणं गरजेचं आहे. शिवाय त्या लोकांच्या शिक्षणाच्या सोई. त्या इवल्या इवल्या बाळांची मनं. तेही जाणणं गरजेचं आहे. त्यांनाही वाटतं की आम्हालाही शिकता यावं. परंतू शिकवणार कोण? त्यातच काहींचे मायबाप अंधश्रद्धेनं मरतात. अनेक जन्मास घातलेली मुलं मागे सोडून. ती डॉक्टरकडे न गेल्यानं व भोंदूकडं गेल्यानं मरण पावतात. ते जाणारही कसे? कारण डॉक्टरकडे जायला पैसे लागतात. महत्वाचं म्हणजे यावर आजच उपाय करण्याची गरज आहे. तो उपाय म्हणजे अशा अनेक मुलं जन्मास घालणा-या लोकांचे सर्वेक्षण व्हावे. त्यांना सरकारनं शेट्टी होममध्ये टाकावे. त्यांना शिक्षण द्यावे. ते शिक्षण निःशुल्क असावे. तसंच जे अनेक मुलं जन्मास घालतात. त्यांना देशातील कोणत्याही सोईसुविधा देवूच नये. कारण त्यांच्यासाठी सोईसुविधा करण्यासाठी व्यवस्था करीत असतांना त्या सुविधेचा बोझा देशावरच पडतो. विशेष सांगायचं म्हणजे देशात कुटूंब नियोजनाची प्रक्रिया जबरदस्तीनं राबवावी. कुटूंब नियोजन एक किंवा दोनवरच जबरदस्तीनं करावं. तिसरं अपत्य झाल्यास कोणत्याच सुविधा देवू नये. सुविधा नाकाराव्यात. मग ते उपाशी मेले तरी चालेल. सरकारही याबाबत कठोर बनावं. केवळ मतदान मिळतं हा उद्देश ठेवू नये. देशहिताचा विचार व्हावा. तसंच अशी जर मुलं भीक मागत असली तरी त्यांना कोणीही भीक देवू नये. तरंच ती मंडळी सुधारतील. जेणेकरून मुलं जन्माला घालणार नाहीत.

# सुख म्हणजे नक्की काय असतं ?



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी

**आयुष्यात येणाऱ्या सुख दुःखाचा सुवास हा प्रत्येकाच्या वाटेला निराळा असतो. एकसारखा मुळीच नाही. आपल्या आयुष्यात उग्र गंध असल्यावर बहुदा दुसऱ्याच्या आयुष्यातील सोनचाफ्याने मन आकर्षित होते. आणि त्या आकर्षणाचे मनाला किंबहुना वेड लागून जाते; परंतु अलवारपणे फुललेला आपल्याच आयुष्यातील मोगरा त्या इतर फुलांच्या तुलनेने कितीतरी पट चांगला आहे हे; मात्र माणसाला कळत असूनही वळत नाही. जेव्हा आयुष्यात काही चांगले नसतं त्यावेळी आपल्याला आपला भूतकाळ आठवतो. भूतकाळ हा आठवांचा सुवास घेऊन आयुष्यात पुन्हा डोकवू पाहतो.**

काही आठवणी गंधाळ असतात, तर काही आठवणी फक्त त्रास देणाऱ्या; परंतु माणसाला भविष्यासाठी गंध वेचता आला पाहिजे. बऱ्याच वेळा अशा घटना आपल्या आयुष्यात घडतात त्या आपल्याला कटाक्षाने नको असतात. मनाविरुद्ध सतत घटना घडू लागल्या की, आशेचा दीप मावळू लागतो परंतु कोणतीही गोष्ट विनाकारण आयुष्यात घडत नाही. यात एक मात्र निश्चित असते फार जास्त वाईट आणि मनाविरुद्ध घडू लागले की मनासारखे किंबहुना त्याहूनही सुरेख असे काही आपल्या आयुष्यात घडणार असते. हे मात्र निश्चित असते. दगडाला मूर्तीचे रूप धारण करण्यासाठी अनेक घाव सोसावे लागतात.ते घाव त्याने नाकारले तर त्याला मूर्तीचे पूजनीय रूप कधीच धारण करता येणार नाही. अवनीलाही उन्हाच्या तीव्र झळांमध्ये पोळावे लागते. शेवटच्या श्वासापर्यंत ती त्या उन्हाशी झुंज देते. अंतर्मनातील गारवा जपते. उष्ण निखारे सोसत राहते. शेवटी घनाचे थेंब कुशीत थै थै नाचू लागताच प्रेमाचा इंद्रधनुष्य अलवार नभाच्या गळ्यात डोलत राहतो. दुःख असो व यातना प्रत्येकाच्या वेळा या ठरलेल्या आहेत. फरक फक्त एवढाच की त्या आपल्या आयुष्यात किती काळ राहतात. वेदनेच्या कुशीतच नव्या आनंदाचा जन्म होत असतो. आयुष्यात जेव्हा फार चांगले मिळणारच ते त्यावेळी त्या सुखाला सांभाळण्याची पूर्वतयारी देव आपल्याकडून आधीच करून घेत असतो. देणे आणि दुखणे कुणालाही नको असते देण्यादेण्यात आणि दुखण्यादुखण्यात फरक असतो. असे खांडेकर म्हणतात. जी गोष्ट दुखण्याची तीच गोष्ट देण्याची देणे हे फार सोपे असते उदाहरणार्थ उपदेश, आदेश, संदेश, व्याख्यान परंतु दान देण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा कर्णासारखे प्रत्येकाला दानशूर होता येत नाही. देणे देण्यामध्ये सर्वात कठीण असते ते म्हणजे अर्थदान; परंतु द्रव्यदान ही दाण देण्याची अंतिम सीमा आहे. ती देणे



ही इतर दानांपेक्षा कठीण आहे. आपले दुःख माणसाला सहजासहजी इतरांना दान करून देता येत नाही. किंवा सुखाचे दान दुसऱ्यांकडून घेता ही येत नाही. आपल्या यातनेच्या घरट्यातून प्रत्येकाला बाहेर पडू वाटते तो केवळ सुखाचा मधुगंध गोळा करण्यासाठी यातनेच्या वाऱ्याला भिऊन आपल्या घरट्यात जरी आपण जाऊ पाहतो. तरी ते घरटं आपल्याला सुख देणारच असतं असं नाही. स्वप्नांचे पंख न फुटलेल्या पाखरांचे ते घरटं रक्षण करत. परंतु पंख फुटलेल्या पाखरांच्या स्वप्नांना आकंचुन धरणारा तो पिंजरा वाटतो. स्वतःला संरक्षित वाटणारा आनंदाचा घट प्रत्येकाला जन्मताच लाभलेला नसतो. ते मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. या घरट्यात राहत असताना अनेक घाणेरी सारखे उग्र वास सोडणारे माणसं सभोवताली असतात. तो उग्र वास आपल्याला नकोसा करतो. तरी अंतरी धैर्याचा सोनचाफा आपला आपल्यालाच पेरावा लागतो. जीवन हे सहज सरळ असतं तर आपल्याला साध्य झालेल्या गोष्टीचा आनंद चिरकाल टिकवता आला नसता किंवा तो आनंदही वाटला नसता. म्हणून आयुष्यामध्ये दुःख असो, यातनेचा वणवा असो, काट्याने घेरलेलं घरटं असो, घाणेरीच्या उग्र वासाने छळणारा उग्र असो, या सगळ्यातून बाहेर पडता येतं किंवा बाहेर पडणं हे लिहिलेलं असतं. सुखाचा गारवा हा प्रत्येकाला मिळत असतो प्रत्येक ऋतू हा बदलतो उन्हानंतर सावली काळोखा नंतर पाऊस प्रयत्नानंतर यश आणि धैर्यानंतर सुख हे सहज जरी वाटत नसलं मात्र ते तितकच सहज आहे. आणि त्याला तितक्या सहजतेने प्रत्येकाला जगता यायला हवं तेव्हाच आपण आपल्या आयुष्यातील गोडवा चाखू शकतो. सुखाची व्याख्या काही निराळी करता येतं नाही. सुख हे दुःखाच्या मागूनच जीवनात येत असतं. त्यात दुःखाचा कटूपणा पटकन चाखला की मग नंतर मागे उरणारे हे सुखच असतं मग नंतर सुखाचा गोडवा अलवार चाखत राहायचा असतो. सुख म्हणजे नक्की काय असतं ? हे प्रत्येकाला मग सहजं आपसूक गवसतं. प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी मात्र हे सहज एकच असतं. तुमच्या आमच्या कल्पना वेगळ्या, सवयी वेगळ्या, आणि सुखाला पाहण्याची दृष्टी वेगळी सरते शेवटी सुख हे एकच. निखळ आनंद पेरणारे .

# जोगिणी - देवदासी प्रथेला प्रतिबंधकर्ते!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला.**



मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वतःचे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. !! छ.शाहू महाराज स्मृती शताब्दी निमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!





# दु:ख विचारपूर्वक प्रकट करा

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

माणसाने भावनिक असलं पाहिजे या मध्ये दुमत नाही पण किती त्याच प्रमाण समजलं पाहिजे. विवेक जागृत ठेवून सत्य असत्य यांच फरक समजला पाहिजे इतकं भावनिक राहण्यासाठी हरकत नाही मग त्या पेक्षा जास्त भावनिक होता कामा नये.हि मर्यादा ओलांडली गेली तर मग मात्र आपण भावनिक तेच्या डोहात बुडातो म्हणून लोक आपला गैरफायदा घेतात म्हणून मर्यादित भावनिक व्हा आणि आपला भेद दुःख कोणाजवळ पण कुरवाळत बसु नका योग्य ठिकाणी दुःख व्यक्त करायला हरकत नाही पण आपल्या दुःखाचा बाजार मांडु नका लोक सहानुभूतीच्या अडुन मजा घेतात हे लक्षात ठेवा. आपलं दुःख हे विचार पुर्वक प्रकट करण गरजेच आहे. खरी सहानुभूती हि खुप कमी म्हणजे अगदी जीवाभावाच्या माणसांकडून मिळते. उर्वरित लोक हे सहानुभूती दाखवताना त्यांच्या डोळ्यात आनंद रस निर्माण होतो .हे वास्तव आहे भले ते मुद्दाम करत असतील नसतील पण तो मानवी स्वभावाचा स्थायीभाव असल्याने आपण आपलं दुःख हे विचार पुर्वक प्रकट करताना भाव ओळखून व्यक्त झालं पाहिजे. जीवनात दुःख नाही असा कोणीही शोधुन सापडणार नाही पण हेच दुःख हि माया यापासून जे वेळीच सावध झाले त्यांना हे दुःख फार वेदना देवु शकत नाही. पण अनेक लोकांना दैनंदिन संसारातील घडामोडी नुसार बहु दुःखांना सामोरं जावं लागतं. मात्र इतरांच दुःख पाहिलं कि आपल्याला हालक वाटत हा मानवी स्वभाव म्हणजे मी एकटाच नाही तर इतरांच्या कडेपण दुःख आहे हे ऐकायला साधारणपणे बरं वाटतं असलं तरी ते सदपुरूषाच लक्षण नाही. दैनंदिन जीवनात आपण जेव्हा दुःखात असतो तेव्हा लोक दोन पद्धतीने आपली विचारपूस करून सहनुभुती प्रकट करत असतात. एक आत्मिक तर दुसरी औपचारिक सहनुभुती असते. यातील आत्मिक भाव सहनुभुती म्हणजे खरी वास्तविक असते. त्या मध्ये आत्मिक भाव जोडलेला असतो. हिच खरी सहनुभुती असल्याने अशाच ठिकाणी आपलं मन मोकळं करायला हरकत नाही पण औपचारिकता सहनुभुती जे दाखवत असतात त्यांच्या कड आपण विचार पुर्वक आपलं दुख प्रकट केल पाहिजे. आपल दुःख हे आपलं दुःख असतं. तसंच आपल्या समोर आलेल्या दुःखाची तीव्रता कमी करण्याची ताकद क्षमता हि फक्त आपल्या स्वतः मध्ये असते. पण आपण तीच क्षमता ज्ञान अवगत करत नाही. आणि दुःख चिवडत बसतो. मुळात दुःखावर ज्ञान हाच प्रभावी उपाय आहे. आपलं दुःख आपल्या वेदना ह्या इतर कोणाच्या समोर प्रकट कराव्यात अथवा कोणाच्या समोर प्रकट करू नयेत. हे तर नक्कीच आपल्याला समजलं पाहिजे. आपल दुःख कोणाला सांगाव याला पण मर्यादा असते. हि मर्यादा समजलीच पाहिजे. अन्यथा लोक आपल्या दुःखात सहनुभुती च्या आडुन आपला आनंद रस घेत असतात. सुख दुःखा शिवाय जीवन पुर्ण होत नाही. जीवनात दुःख आलच नाही असं कोणीही शोधून सापडणार नाही. सुख दुःखांच्या लहरी ह्या आयुष्यात आल्यामुळे त्याचे परिणाम आपल्या सह कुटुंबावर होतातच. आपल्या जीवनात जर सुख आलं तर आपल्याला आपला कोणीही चिंतक हिंतक विचारण्यासाठी येत नाही. अथवा आपल्या सुखाशी कोणालाही काहीही देणेघेणे नसते. म्हणजे आपलं हित झालं तर त्याच कोणालाही काही पडलेलं नसतं पण यदाकदाचित आपल्यावर संकटं आल वाईट वेळ आली दुःखांचा डोंगर कोसळला आपली परिस्थिती हालाकीची झाली अर्थिक विवंचना निर्माण झाली यापैकी कोणत्याही दुःखांचा प्रवेश जीवनात झाल्यानंतर आपण जेव्हा दुःखाच्या मायेत असतो त्यावेळी मात्र अनेक जण आपली विचार पुस करतात विचार पुस करताना संबधीताच्या डोळ्यातील भाव निट पाहा काळजी पुर्वक पाहा लोक आपल्याला सहानुभूती दाखवत असताना ते वेगळा रस घेत असतात हे वास्तव आहे. म्हणुन आपलं दुःख हे विचार पुर्वक लोकांच्या समोर प्रकट केल पाहिजे.

# समाजवास्तवाला वाचा फोडण्याची जबाबदारी प्रसारमाध्यमांची

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १५

प्रिंट मिडिया असो की, इलेक्ट्रॉनिक मिडिया... हेच आता समाजाचा आरसा आहेत. समाजाचा आरसा म्हणजे देशाचा आरसा. हा आरसा पत्रकाराच्या हातात असतो. म्हणून समाजाचे डोळे मिडियाकडे लागलेले असतात. मात्र तो कसा फिरवायचा, कुठे फिरवायचा, फिरवायचा की, नाही आणि काय दाखवायचं, कशाचं प्रतिबिंब दाखवायचं. हे पत्रकार बांधवच ठरवू शकतात. म्हणजे पत्रकारितेत अर्थात प्रसारमाध्यमांमध्ये खूप मोठी शक्ती आहे; परंतु ह्या शक्तीचा वापर करणारी मंडळी वृत्तपत्र क्षेत्रातील नसून ती उद्योग जगतातील किंवा राजकीय जगतातील आहेत. म्हणून पत्रकारितेची, प्रसारमाध्यमांची शक्तीच अलिकडे डायव्हर्ट केली जात आहे. प्रसारमाध्यमांच्या शक्तीला कमकुवत करून तिला व्यवसायाभिमुख बनवले जात आहे. ३० वर्षापूर्वी पत्रकारितेचे स्वरूप सत्यवादी होते. त्या काळी वास्तवाचे भान आणि जाण असलेली पत्रकारिता होती. अलिकडे पत्रकारितेतील सत्यवाद आणि निष्ठा लोप पावत चालली आहे. सत्यवादी विचारधारेला खीळ बसत आहे व निष्ठा पुंजीवाद्यांकडे, चंगळवाद्यांकडे, भांडवलवाद्यांकडे डायव्हर्ट होतांना दिसते आहे. बरीचशी वृत्तपत्रे ही उद्योजक, नेते, पक्षप्रमुख यांच्या मालकीची आहेत. ते आपापल्या दुकानदारीचा भ्रष्ट चेहरा झाकून बेगडी चेहरा फोकस करण्यासाठी वृत्तपत्राचा वापर करून घेत आहेत. म्हणजे पत्रकारितेचा म्हणण्यापेक्षा प्रिंट मिडियाचा व इलेक्ट्रॉनिक मिडियाचा वापर आता केवळ विकृती झाकून फक्त स्वतःच्या किंवा पक्षाच्या चांगुलपणावर फोकस करण्यासाठीच होतांना दिसतोय ! बहुतांश वृत्तपत्रे ही कुठल्यातरी पक्षाच्या मालकीची आहेत. संस्थाचालकांच्या मालकीची आहेत. अर्थात कुठल्यातरी समुहाची आहेत. त्या समुहाच्या भ्रष्टाचाराचा व काळ्याधंद्याचा खरा चेहरा झाकण्यासाठी वृत्तपत्राचा वापर केला गेला आहे व तो काही प्रमाणात आजही होत आहे. पक्षाचे वृत्तपत्र पक्षाच्या नेत्यांचे स्टेटमेंट, नेत्यांचे दौरे व पक्षातील विशेष घडामोडींना प्राधान्य देताना दिसताहेत.! पक्षाच्या विचारधारेनुसार विरोधी पक्षावर तोंडसुख घेण्यासाठीही वृत्तपत्राचा किंवा इलेक्ट्रॉनिक मिडियाचा वापर केला जातोय.! एका पक्षाचे वृत्तपत्र दुसऱ्या पक्षाच्या विकृतीचे वाभाडे काढतांना दिसतेय; मात्र स्वतःच्या पक्षाच्या विकृतीला उजागर करत नाहीत. अशा प्रकारची पत्रकारिता आणि वृतपत्रे असतील तर जनतेच्या प्रश्नांचं काय ? अशा पत्रकारितेला सत्यवादी पत्रकारिता म्हणावे का ? हिला कोणती पत्रकारिता म्हणावे ? असा प्रश्न पडतो.! वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटले आहे. खरी पत्रकारिता ही लोकशाहीची पाठराखण करणारी असते, तर विकृतीचे पाठराखण करणारी पत्रकारिता हुकुमशाहीचे समर्थन करणारी असते. खरेतर देशातल्या समाजवास्तवाची चिकित्सा करण्याची जबाबदारी ही निर्भिड,निष्पक्षपाती, सत्यवादी पत्रकारितेची आहे. म्हणून देशातील सर्व घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सत्यवादी, निर्भिड, निष्पक्षपाती पत्रकारिताच करू शकते. लोकांच्या प्रश्नांना, समस्यांना, शासन दरबारी मांडून वाचा फोडण्याचे काम एकतर विरोधीपक्ष करत असतो किंवा प्रसारमाध्यमे करत असतात. आता जर सत्ताधारी राज्यकर्तेच प्रसारमाध्यमांना विकत घेत असतील, तर लोकशाहीचा चौथा आधारस्तंभच कोलमडून पडलेला असेल, तर मग लोकशाहीतील अतिसामान्य जनतेच्या समस्यांचे काय ? म्हणून प्रसारमाध्यमांनी राजकीय विकृतीवर बोलायला पाहिजे; मात्र तसे होतांना दिसत नाही. विद्यमान परिस्थिती अत्यंत भयावह आहे. सर्वसामान्य जनतेचा कुणीच वाली नाही. सर्वसामान्य लोकांसाठी ह्या योजना, त्या योजना आणल्या आहेत.. अशा जाहिराती केल्या जाताहेत प्रत्यक्षात मात्र गोरगरीब, सर्वसामान्य माणूस महागाईशी झुंज देत आहे. महागाई, रोगराई, बेरोजगारी, ह्या घटनांनी सर्वसामान्य जनता हवालदिल झाली आहे. याबाबत आजची पत्रकारिता सत्ताधारी पक्षाला धारेवर धरतांना दिसत नाही किंवा विरोधी पक्षनेते या घडामोडींना चव्हाटयावर आणतांना दिसत नाहीत. पाच वर्षे फक्त सत्तेच्या स्वार्थासाठीच एकमेकांना भांडतांना दिसताहेत आणि या नेत्यांच्या भांडणांचे भांडवल करून स्वतःचा टी.आर.पी. वाढवत आहेत. अशी पत्रकारिता जनतेला न्याय कसा देणार ? सत्ताधाऱ्यांच्या विषमतावादी धोरणावर पत्रकार किंवा विरोधी पक्षनेते जर बोलणार नसतील तर जनतेने कोणाच्या तोंडाकडे पहावे ? कोणाचा आधार घ्यावा ? बरं पत्रकारिता किंवा वर्तमानपत्रे ही आता फक्त शहरी भागापुरती मर्यादित राहिलेली नसून तिचे लोण आता ग्रामीण भागातही पोहचले आहे.यतिचे स्वरूप विस्तारले आहे, आता तर अति सामान्य जनतेचा आवाज जिवंत ठेवण्याचे काम फक्त पत्रकारिताच करू शकते व ते पत्रकारितेने, वृत्तपत्राने केलेच पाहिजे. ही फार मोठी जबाबदारी पत्रकारांची, वृत्तपत्रांची अर्थात प्रसारमाध्यमांची आहे. खरेतर अलिकडे प्रसारमाध्यमांच्या कक्षा खूप विस्तारल्या आहेत. प्रसारमाध्यमांना चांगले दिवस आले आहेत. आधुनिकीकरणाचे परिणाम समाजाच्या जीवनमानावर, राजकारणावर, अर्थकारणावर आणि प्रसारमाध्यमांवरही झालेले आहेत. याबदलाचा परिणाम पत्रकारितेवरही झाला आहे. विकसीत तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्राचे स्वरूपही बदलले आहे. तंत्रज्ञानामुळे छपाई सोपी झाली आहे. मोबाईल, टीव्ही व इंटरनेटवरचे प्लॅटफॉर्म्स पत्रकारितेला आधार झाले आहेत. पत्रकारिता ह्या पाच-सहा वर्षांत ग्रामपातळीवर पोहोचून ती लोकाभिमुख व सर्व समावेशक सुद्धा झाली आहे; परंतु पत्रकारितेने काहीप्रमाणात राजकारणाचे दास्यत्व पत्करलेले दिसून येत आहे, पुंजीवाद्यांचे मांडलिकत्व पत्करलेल्या पत्रकारितेला कुठलेही तात्विक अधिष्ठान राहिले नाही. अशी तात्विक अधिष्ठान नसलेली पत्रकारिता अतिसामान्य जनतेच्या प्रश्नांची कशी दखल घेईल ? अशा भांडवलवाद्यांचे, पुंजीवाद्यांचे मांडलिकत्व पत्करलेल्या पत्रकारितेमुळे जर अतिसामान्य जनतेची मुस्कटदाबी झाली किंवा त्यांचे प्रश्न शासनदरबारी जर मांडले गेले नाहीत, तर सामान्य माणसाला न्याय देणारी लोकशाहीच जखमी होईल आणि अराजकता माजेल व हुकूमशाहीला जन्माला घालण्यास पत्रकारिताच जबाबदार असेल ! म्हणून वृत्तपत्रांनी, पत्रकारितेनी समस्त प्रसारमाध्यमांनी लोकशाहीचा खून होण्यास व हुकूमशाहीला जन्माला घालण्यास कारणीभूत ठरू नये या अपेक्षेसह सर्व एकनिष्ठ, तत्ववादी, सत्यवादी, निर्भिड, निष्पक्षपाती पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार बांधवांना वृत्तपत्रांना व प्रसारमाध्यमांना समाजवास्तवाची सत्य बाजू मांडण्यासाठी मनस्वी शुभेच्छा.!



## बुद्धाची ज्ञानप्राप्ती-एक महाकाव्य पुस्तकाने डॉ. अमर चौरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** माय रमाई फाऊंडेशन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अमर चौरे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट देण्यात आली. यावेळी निरा, ता. पुरंदर येथील सामाजिक कार्यकर्ते अमोल साबळे यांच्या हस्ते "बुद्धाची ज्ञानप्राप्ती-एक महाकाव्य" हे जेष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी लिहिलेले पुस्तक देऊन डॉ.अमर चौरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कामशेत, ता.मावळ येथे डॉ.अमर चौरे यांचे विशेष उल्लेखनीय कार्य असून काही दिवसांपूर्वीच दिल्ली येथे त्यांना डॉक्टरेट पदवी देण्यात आली होती. त्यांच्या या पदवी बद्दल त्यांचा सत्कार हा पुस्तके देऊन करण्यात आला. पुस्तक देऊन हा सत्कार केल्याबद्दल या सत्काराबद्दल डॉ.अमर चौरे यांनी विशेष समाधान व्यक्त केले आहे. यावेळी निरेचे सामाजिक कार्यकर्ते अमोल साबळे, अंकुश चव्हाण, चंद्रकांत ओव्हाळ, गोपाळ शेट्टी, सुशिल गायकवाड आदी उपस्थित होते. ट्रस्टच्या माध्यमातून कशा प्रकारे कार्य चालू आहे. याबद्दलची माहीती जाणून घेण्यात आली.

डॉ. अमर चौरे हे स्वतः बौध्द धम्माचे विधी करणारे बौद्धाचार्य असून ट्रस्टकडून सर्व धर्मिय वधू वर सूचक केंद्र चालविले जात असून कोरोना काळात ३०० हून अधिक लग्न जमवून देण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांच्या कडून करण्यात आलेला आहे.ते कायम सामाजिक कार्यात अग्रेसर असतात.काही दिवसांपूर्वीच त्यानी कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करणारा सोहळा सुद्धा आयोजित केला होता.अनेक कार्य करणाऱ्या व्यक्तींची दखल ट्रस्टकडून घेण्यात आली होती. ट्रस्टचे कार्य विश्वासपूर्वक असेच वाटत असून हे कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे, अशा प्रकारचे कौतुक अमोल साबळे यांनी केले. अनेक कुटूंबाना जोडण्याचे काम होत असताना यापुढे ही असेच कार्य घडत राहो, असे सुशिल गायकवाड यांनी म्हटले आहे.

## पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांचा एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनतर्फे सत्कार

### अध्यक्ष, रतन कुमार साळवे यांचा वाढदिवस उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**संभाजीनगर :** एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष रतन कुमार साळवे यांच्या वाढदिवसानिमित्त पुंडलिक नगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. असोसिएशनच्या वतीने रतनकुमार साळवे व कार्याध्यक्ष रशपालसिंग अट्टल यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांनी वेळो वेळी परिस्थितीला अनुसरून कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दाखवलेली तत्परता उल्लेखनीय आहे. सर्वसामान्यांना पोलिसांबद्दल भीती वाटू नये. पोलीस आपला भाऊ आपला मित्र, हितचिंतक, आपला संरक्षक आहे. या भावनेतून एकमेकांशी हितगुज असावे. पोलीस अधिकाऱ्याचा सर्वसामान्य नागरिकासोबत कसा सुसंवाद असावा याचे एक जितेजागते उत्तम उदाहरण म्हणून पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांच्याकडे बघितले जाते. आतापर्यंत त्यांची एकूणच कारकीर्द लक्षात घेऊन, त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे पदधिकाऱ्यानी पुंडलिक नगर पोलीस स्टेशन येथे जाऊन राजश्री आडे याचा सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सत्काराला उत्तर देतांना राजश्री आडे म्हणाल्या किं, काही अपवाद सोडला तर पोलीस कधीच वाईट वागत नसतात. वेळप्रसंगी त्यांना कठोर भूमिका घ्यावी लागते. प्रसंगी काहीजण दुखावले जातात. दुःखी झालेले पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. काही अपवाद असेलही मी नाकारणार नाही. परंतु जवळजवळ सर्वच पोलीस अधिकारी प्रामाणिकपणे आपलं कर्तव्य बजावत असतात. जनतेचे संरक्षण ही आमची जबाबदारी आहे. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला न्याय कसा देता येईल. त्याच्यावर अन्याय होणार नाही. याची मी काळजी घेत असते. पोलिसाविषयी सर्वसामान्यांना भीती न वाटता, पोलीसांविषयी त्यांची आत्मियता कशी वाढेल यासाठी मी नेहमी प्रयत्न करत असते. अर्थातच मी शंभर टक्के नागरिकांना त्यांच्या मनाप्रमाणे खुश करू शकत नाही. परंतु अन्याय झालेला असेल तर आरोपीना कदापी सोडणार नाही. हे त्यांनी ठणकावून सांगितले. सत्याच्या बाजूने मी नेहमी तत्परतेने उभी आहे. एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने आज माझा जो सन्मान झालेला आहे. या सत्कारामुळे मी मुळीच भारावून जाणार नाही. पत्रकार बांधवांनी देखील आमच्यासोबत शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सहकार्य करावें असेही त्या यावेळी म्हणाल्या. यावेळी रतनकुमार साळवे यांना वाढदिवसानिमित्त त्यांनी एक ग्रंथ भेट दिला. असोसिएशनचे कार्यअध्यक्ष, रशपालशिंग अट्टल, बबन सोनवणे, बाजीराव सोनवणे, राज ठाकरे, महेश मुरकुटे, सुनील निकाळजे, जैस्वाल आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सातत्य असेल तरच खेळाडू तरबेज होईल : माजी आ. रोहिदास चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कराटे प्रशिक्षकांनी प्रशिक्षण अतिशय उत्कृष्ट रित्या देऊन भावी पिढी निर्माण करावी. प्रथम क्रमांक शिक्षणाला देऊन दुसरा आपल्या आवडीनिवडी नुसार आवडीच्या खेळात तरबेज व्हावे. जर मनाची तयारी सातत्य असेल तर विद्यार्थी खेळात नक्कीच प्राविण्य घेऊन भविष्य उज्वल करू शकतो असे प्रतिपादन शिवसेना लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी केले. शहरातील कै.विश्वनाथराव नळगे विद्यालयाच्या प्रांगणात दिनांक 30 एप्रिल रोजी तीन महिने कालावधी पूर्ण केलेल्या बालवयातील कराटे खेळाडूंना प्रमाणपत्राचे व बेल्टचे वितरण करताना माजी आमदार रोहिदास चव्हाण बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शहराचे पहिले नगराध्यक्ष कै.माणिकरावजी पवार यांचे नातू समाजसुधारक मधुकर पाटील पवार, डॉ. गजानन पाटील पवार, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठ्ठभाऊ चव्हाण, प्रशिक्षक सदाशिव राठोड, राणी राठोड, मनोहर बावळ, साई सूर्यवंशी, सविता नागरगोजे उपस्थित होते.

यावेळी उपस्थित बाल प्रशिक्षणार्थी कराटे खेळाडूंना अध्यक्षीय समारोपात संबोधित करताना शिवसेना ठाकरे गटाचे लातूर जिल्हा संपर्क प्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले की, योगा प्रमाणे शरीर सुदृढ करण्यासाठी सदरील प्रशिक्षण अतिशय उपयुक्त असून स्वतःच्या संरक्षणासाठी तसेच अपवादात्मक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी खेळाडू भविष्यात नक्कीच याचा उपयोग करून अन्यायावर प्रति वार करण्यासाठी करतील. स्वतःबरोबर याचा इतरांनाही उपयोग व्हावा जेणेकरून गैर उपयोग होऊ नये अशी शेवटी अध्यक्षीय समारोपात बोलून दाखवत कराटे खेळाडूंना व प्रशिक्षकांना शुभेच्छा दिल्या.यावेळी बालखेळाडूंनी प्रत्यक्ष सादरीकरण करून दाखविले.प्रेक्षकांनी टाळ्यांची दाद दिली.माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी गुणगौरव करत खेळाडूंवर स्तुती सुमने उधळली.मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थी कराटे खेळाडूंना प्रमाणपत्र व बेल्टचे वितरण करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव पुंडे यांनी केले. यावेळी प्रशिक्षणार्थी खेळाडू, पालक , प्रतिष्ठित नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# प्रकाश पाटील यांचे उपोषण मागे

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारतीताई पवार यांची मध्यस्थी

आधुनिक केसरी न्यूज




**निफाड :** लासलगाव विंचूर सह १६ गांव पिण्याच्या पाणी प्रश्नी शिवसेना निफाड तालुका प्रमुख प्रकाश पाटील दि.१ मे पासून उपोषणाला बसले होते. त्यांच्या उपोषणाची केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारतीताई पवार यांनी दखल घेतली असून त्यांनी सर्व मागण्या मान्य केल्याने तब्बल ५१ तासांनी प्रकाश पाटील यांनी उपोषण मागे घेतले आहे.

अशुद्द पिण्याचा पाणी पुरवठा तोही तीन आठवड्याने करून नागरिकांच्या जीवाशी खेळणारी समिती तात्काळ बरखास्त करावी, समितीच्या सचिवावर कडक कार्यवाही करून नवीन अधिकारी नेमण्यात यावा, लाभार्थी गावांना नियमित शुद्द पाणीपुरवठा व्हावा, समितीच्या मनमानी कारभाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, शुद्द पाणीपुरवठयाचे वेळापत्रक प्रसिद्दी माध्यमातून दररोज जाहीर करावे, लाभार्थी गावांना तीन वर्षांपासून सुरळीत पाणीपुरवठा न झाल्याने किमान तीन वर्षांची पाणी पट्टी माफ करावी, थकबाकी पाणीपट्टी प्रश्नी तोडलेले नळ कनेक्शन तात्काळ जोडावे या मागण्यांसाठी प्रकाश पाटील यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. या उपोषणामुळे महिला वर्ग जास्त आक्रमक झाला होता. आमदार, खासदार यांना गावबंदी, ग्रामपंचायत कार्यालयास कुलूप ठोकण्याचा इशारा देत महिलांनी उपोषणास पाठिंबा दिला होता. शेकडो युवकांनी ग्रामविकास अधिकारी शरद पाटील यांना घेराव घातला, शेकडो युवकांनी मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांना ई-मेल केले होते. या प्रकरणाची दखल घेऊन भारतीताई पवार यांनी नाशिक येथे मंगळवार सायंकाळी तातडीची बैठक घेऊन प्रकाश पाटील यांच्याशी वी.सी.द्वारे संपर्क करून चर्चा केली. त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांशी याप्रश्नी चर्चा करून सविस्तर अहवाल व पूर्ण योजनेबाबत माहिती घेऊन दोन महिन्यात योजना सुरू करून नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याबाबत कडक भाषेत सूचना केल्या. आज त्यांचे सहाय्यक डॉ.उमेश काळे, नासिक जीवन प्राधिकरणचे शाखा अभियंता प्रताप पाटील, शाखा उपअभियंता ए.वाय.निकम, सहा.अभियंता अशोक बिन्नर यांनी उपोषण स्थळी समक्ष भेट दिली. सदर योजनेची ६ एप्रिल २०२४ पर्यंत कामाची मुदत आहे. त्यात अर्धवाहिनी सहा किलोमीटर पर्यंत बदलणे व जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती ही कामे जुलै २०२३ पर्यंत विना अडथळा पूर्ण करून नळाद्वारे शुद्ध पाणीपुरवठा सुरू होईल व याबाबत उच्चस्तरीय चौकशी करून कडक कार्यवाही केली जाईल. तसेच या योजनेसाठी १५ दिवसात नवीन सचिव नेमला जाईल, तोडलेल्या नळजोडण्या पूर्ववत केल्या जातील अशा सूचना भारतीताई पवार यांनी केल्याचे लेखी पत्र प्रकाश पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले व भारतीताई पवार यांनी दूरध्वनीद्वारे उपोषण मागे घेण्याची विनंती केली.

त्यामुळे पाटील यांनी मुलगी नित्या हिच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन उपोषण मागे घेतले. याप्रसंगी मंडळ अधिकारी एस.डी.देवकाते, स.पो.नि.राहुल वाघ, प्रवीण कदम, ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप, अमृता पवार, स्मिता कुलकर्णी, गणेश डोमाडे, छबुराव जाधव यांसह लासलगाव, पिंपळगाव नजीक, टाकळी विंचूर कोटमगाव येथील सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते. पोलीस निरीक्षक राहुल वाघ व कर्मचारी वर्ग यांनी मोठ्या प्रमाणावर चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता.

# अंकुर वाढवे करतोय दिग्दर्शनात पदार्पण!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अंकुर वाढवे हा सगळ्यांनाच चला हवा येऊ द्या च्या माध्यमातून माहिती आहे. नाट्य क्षेत्रातही तो तेवढाच सक्रिय आहे. व्यावसायीक नाटक सर्किट हाऊस, कन्हैया, आम्ही सारे फर्स्टक्लास, गाढवाचं लग्न, निम्मा शिम्मा राक्षस, करून गेलो गाव आणि सध्या सुरू असलेलं वासुची सासू या नाटकातून प्रेक्षकांना मंतरमुग्ध करतो आहे. आता अंकुर वाढवे दिग्दर्शक म्हणून आपल्या 'व्यक्ती प्रवृत्ती' या कथानाट्य प्रायोगिक नाटकातून पदार्पण करतोय. या नाटकात संजना पाटील, अमोल भोसले, सायली देशमुख, लंकेश थोरात, जुईली शेलार, परमेश्वर गुट्टे, सोनाली, अंकुर वाढवे हे कलाकार काम करणार असून याचा प्रयोग येत्या ६ मे ला दुपारी ४ वा. पु. ल. देशपांडे मिनी नाट्यगृह व १२ मे ला दुपारी ४.३० वा. प्रबोधनकार ठाकरे मिनी नाट्यगृह येथे होणार आहे.




# महाराष्ट्र दिनानिमित्त तहसील कार्यालयात आ. प्रशांत बंब यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महाराष्ट्र राज्य 63 वा स्थापना दिनानिमित्त आज दि १ मे रोजी महाराष्ट्र दिना निमित्त आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते खुलताबाद तहसील कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले यावेळी तहसीलदार सुरेंद्र देशमुख, भद्रा मारोती संस्थानचे अध्यक्ष मिठठू पाटील बारगळ माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष एल जी गायकवाड प्रकाश वाकळे प्रवीण सुरडकर पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे दिनेश अंभोरे पुंजाजी नलावडे नवनाथ बारगळ ज्ञानेश्वर बारगळ योगेश बारगळ परसराम बारगळ, आशिष कुलकर्णी सतीश दांडेकर, आजिनाथ नागे प्रवीण बारगळ उमेश आवारे संतोष घुसिंगे, रजाक पठाण, गोपाल वर्मा नारायण वाकळे. नायब तहसीलदार सतीश देशमुख, राजपूत तलाठी बंडू आव्हाड, सिद्धेश्वर गायकवाड पत्रकार विजय चौधरी पत्रकार देवदत्त कोठारे यांच्या सह तालुक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक तसेच तहसील कार्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



# पंढरीत अवतरणार संतांची मांदियाळी

## उद्यापासून विठ्ठल मंदिरात संत चरित्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जगाच्या कल्याणा संताच्या विभूती हे ब्रीद घेऊन गुरुवार ( ता. 4 ) पासून सलग तीन दिवस दररोज सायंकाळी सात वाजता पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात 'पांडुरंगी' या संगीतमय संत चरित्र दर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती, वैभवीश्री यांनी दिली.

प्रख्यात प्रवचनकार वैभवीश्री यांचा नुकताच विजयपूर रोड, सोलापूर येथे सत्संग झाला. या सत्संगाच्या समारोपानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. वैभवीश्री यांच्या सानिध्यात व आळंदी येथील समस्त साधक बालकांनी सादर केलेली संगीतमय कलाकृती 'पांडुरंगी ' ही संत चरित्र दर्शन घडविणारी कलाकृती आहे. संतांचे चरित्र प्रत्यक्ष नाट्यकृतीतून पाहण्याची संधी पंढरपूरकरांना उपलब्ध होत आहे.

याबद्दल अधिक माहिती देताना वैभवी श्री म्हणाल्या, उत्तर भारतामध्ये कृष्णचरित्रावर अनेक धार्मिक कार्यक्रम होतात. कृष्णचरित्र मोठ्या प्रमाणात संगीतमय नाट्यकृतीतून सादर केले



जाते. याच धर्तीवर महाराष्ट्रातील संतांचा परिचय भाविकांना व्हावा, यासाठी संतांचे चरित्र संगीत व नाट्य स्वरूपात सादर केले जाणार आहे. गुरुवार ता. 4 मे रोजी जनाबाई चरित्र, 5 मे रोजी सखुबाई चरित्र, 6 मे रोजी संत भानुदास चरित्र सादर करण्यात येणार आहे. विठ्ठल मंदिरातील सभा मंडपात दररोज सायंकाळी हा कार्यक्रम होणार आहे, भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैभवीश्री यांनी केले आहे.



# गेवराईसेमी येथे हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**गेवराईसेमी :** अखंड हरिनाम सप्ताह गेवराईसेमी तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे काल्याची किर्तन सेवा आदरणीय गुरुवर्य गोरक्षक हभप बालगीरी महाराज यांची बजाजनगर झाली. यावेळी सप्ताहाचे मार्गदर्शक ह.भ.प. कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर, तालुका फुलंब्री, संगीत विषारद नामदेव महाराज आगळे पैठणकर, सप्ताहाचे आयोजक ह.भ.प. प्रभुशेठ घुगे, ह.भ.प. गणेश महाराज घुगे, गेवराई, कीर्तनाचे यजमान मन्सुब महाराज वाघ बुलढाणा, आसाराम पाटील ताठे यशवंतबाबा गेवराई मृदंगाचार्य गौरव महाराज मोकाशे पिशोर पवन महाराज समस्त ग्रामस्थ भजनी मंडळी गवराईसेमी यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरून कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# देशी कट्टा बाळगणाऱ्या दोन तरुणांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** देशी कट्टा बाळगून दुचाकीने फिरणाऱ्या दोघांना फ्रेजरपुरा पोलिसांनी विद्यापीठ चौक परिसरातून अटक केली. त्यांच्याकडून देशी कट्टा व दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. संघर्ष रवींद्र फुले ( २९ ) रा. वडाळी व यशकुमार भाऊराव गोसावी ( ३४ ) रा. बडनेरा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोन तरुण देशी कट्टा बाळगून राजुरा नाका ते विद्यापीठ चौक मार्गावर दुचाकीने फिरून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत असल्याची माहिती फ्रेजरपुरा पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी राजुरा नाका ते विद्यापीठ चौक मार्गावर सापळा रचून दुचाकीस्वार संघर्ष फुले व यशकुमार गोसावी यांना पकडले. अंगझडतीदरम्यान यशकुमार याच्याजवळ देशी कट्टा व मॅगझिनमध्ये दोन जिवंत काडतूस आढळून आले. पोलिसांनी दोघांनाही अटक करून त्यांच्याकडून दुचाकी, देशी कट्टा व दोन काडतूस असा एकूण ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई फ्रेजरपुराचे ठाणेदार गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक आकाश वाठोरे, सुनील सोळंके, महेंद्र वलके, सागर पंडित, शेखर गायकवाड यांनी केली.



# चोरट्यांचा मोर्चा आता मंदिराकडे; एका रात्रीत पाच मंदिरे फोडली

## शिवशक्ती आश्रमातील घटना; दानपेटी चोरीचा प्रयत्न फसला

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जालना-राजूर मुख्यरस्त्यावरील तुपेवडी येथील शिवशक्ती आश्रमात रात्रीच्या वेळी चोरट्यांनी दानपेटी फोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला परंतु मंदिरातील पूज्य खडेश्वरी बाबांच्या जागरुकतेमुळे चोरट्यांचा डाव फसला असून दानपेटी सोडून अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी तेथून पळ काढला.चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून अज्ञात चोरट्या विरुद्ध जालना तालुक्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



सविस्तर माहिती अशी की परवाच्या मध्यरात्रीच्या सुमारास शिवशक्ती आश्रम तुपेवाडी येथील मंदिरात चोरी करण्याच्या उद्देशाने अज्ञात चोरट्यांनी मंदिराचे उत्तर प्रवेशद्वारचे कुलूप तोडून आत घुसून दानपेटी तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु मंदिरातून तोडफोडीचा आवाज येत असल्यामुळे परमपूज्य खडेश्वरी बाबा यांना जाग आली आणि बाबाजी मंदिराच्या दिशेने निघाले. आपल्याकडे कुणीतरी येत आहे याची चाहूल लागताच चोरटे दानपेटी सोडून तेथून पसार झाले.

विशेष बाब म्हणजे चोरट्यांचे धाडस इतके वाढले असून त्यांनी एकाच रात्रीतून परिसरातील पाच मंदिरात चोऱ्या करण्याचा प्रयत्न केला.त्यामध्ये ढवळापुरी-गणपती मंदिर, राळा हीवरा-देवीचे मंदीर,पठाळगाव-कानिफनाथ मंदीर, तुपेवाडी-शिवशक्ती आश्रम मंदिर आणि चिखली येथील दत्तमंदिरात चोऱ्या करण्याचा प्रयत्न झाला. म्हणून आता चोरट्यांनी आपला मोर्चा मंदिराकडे वळवला असल्याचे दिसून येत आहे.याही अगोदर अनेक वेळा चोरट्यांनी मंदिरात चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाचा धाक आहे की नाही असा प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून उपस्थित केला जात आहे. सदरील घटनेमुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात असून भक्तांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे.अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी तुपेवाडी येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे.चोरट्यांविषयी पोलिसांना गुप्त माहिती दिल्यास रावसाहेब राठोड यांनी २१ हजार रुपयांचे बक्षीसही जाहीर केले आहे.सदरील घटनेचा तात्काळ शोध लावून कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. संबंधित घटने विरुद्ध शिवशक्ती आश्रमाच्या वतीने जालना तालुक्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.




बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र दिनी ( १ मे) वृत्तपत्रांच्या शासकीय जाहिरातींच्या थकीत बिलासाठी संपादक संघाच्या वतीने धरणे आंदोलन केले.पालकमंत्री अतुल सावे यांनी आंदोलन स्थळी येऊन निवेदन स्विकारले व जिल्हाधिकारी यांना दोन दिवसांत भूसंपादन अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रलंबित जाहिरात बिलांचा विषयी मार्गी लावण्याची सूचना दिली. यावेळी शहरातील संपादक पत्रकार उपस्थित होते.

# जूदो वर्गाचे प्रात्यक्षिक शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ज्युदो संघटनेतर्फे जागृत हनुमान मंदिर, विद्यानगर येथे ज्युदो प्रात्यक्षिक आणि मोफत ज्युदो व स्वसंरक्षण वर्ग सुरू करण्यात आला.या ज्युदो वर्गचे मुख्य प्रशिक्षक चंद्रशेखर पोळ , दत्तू पवार , महिलांसाठीच्या प्रशिक्षक दीप्ती शेवतेकर यांची उपस्थिती होती. छत्रपती संभाजी नगर जिल्हा ज्युदो संघटनेचे सचिव अतुल बामनोदकर, सहसचिव विश्वास जोशी, विश्वजीत भावे, प्रसन्न पटवर्धन, भिमराज राहणे, अशोक जंगमे, झिया अन्सारी, संजय परळीकर, विजय सिरास्वल व जेष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर व सौ पद्मजा पोळ अशा मान्यवरां बरोबरच विद्यानगर, विजयनगर येथील पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जागृत हनुमान मंदिर, विद्यानार यांच्या तर्फे विद्या नगर अध्यक्ष :अर्जुन गायके, कार्याध्यक्ष : पंजाबराव तोर, कार्यक्रमाचे अध्यक्षःसत्यपाल कटारिया , कोषाध्यक्षः आनंद लाहोटी यांची उपस्थिती होती. नंदकिशोर वर्मा आणि विश्वास काळे यांनी सूत्रसंचालन केले. बजाजनगर व सिडको हॉल वरील राष्ट्रीय खेळाडूंनी चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



# फाशी घेऊन तरुणाची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील 32 कॉटर येथे दिलीप देविदास निकम उर्फ ( माया ) ह्या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. एका नायलॉन दोरीच्या साह्याने पंख्याला बांधून एक ते दोन वाजेच्या सुमारास गळफास घेतल्याचा अंदाज आहे. रात्री 12 ते १ च्या दरम्यान सोबत असलेल्या मित्रांनी सांगितले की तो रात्री दारू च्या नशेत असताना त्याला मित्रांनी सुखरूप 32 कॉटर येथे सोडले. त्यानंतर नशेच्या धुंदीत हा पराक्रम केला असेल असा अंदाज आहे. परंतु आत्महत्येचं कारण अद्यापही कळलेले नाही त्या हद्दीतील पोलिसांना वारंवार फोन



करूनही वेळेवर पोचले नाही व पोलीस पुढील प्रक्रियेला दिरंगाई करत आहे असा आरोप ही करण्यात आला. फोन केल्यानंतर तब्बल एक तासाने तासानंतर पोलीस घटनास्थळी उपस्थित झाले. देविदास निकम उर्फ माया हा सिविल हॉस्पिटल येथे रोजंदारीने काम करत होता परंतु नातलगांपासून वेगळा राहत होता. हिरे मेडिकल सिव्हिल हॉस्पिटल येथे करुणाच्या काळात कोरोना योद्धा म्हणून मोठी भूमिका निभवली होती. या अशा कोरोना योद्धांमुळे धुळे जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला परंतु कोरोना संपल्यानंतर कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यात आले व काहींची परिस्थिती बिकट झाल्याने कित्येकांचे खाण्यापिण्याचे हाल झाले. त्यात दिलीप निकम याची परिस्थिती ही बिकट होती त्याला हॉस्पिटल येथे कधी काम मिळायचे तर कधी नाही त्यामुळे तो व्यसनाच्या आधीन गेला व असा निर्णय घेतल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. त्याचे शरीर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शव निच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे व पुढील तपास पोलीस कर्मचारी करत आहेत.

# वऱ्हाडींना भोवली फटाक्यांची आतिषबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** लग्न समारंभात अनुचित घटना घडण्याचे प्रकार हल्ली वाढले आहेत. काहीच दिवसांपूर्वी लग्नात नाचणाऱ्या एका तरुणाला डीजेच्या आवाजाने कायमचा बहिरेपणा आल्याची ताजी घटना असताना आणखी एक प्रकार भंडारा जिल्ह्यात समोर आला आहे. मंगलाष्टके संपताच वर पक्षांकडील काही अती उत्साही तरुणांनी मंडपाबाहेर फटाक्यांची आतिषबाजी सुरू केली. मात्र, त्यांचा हा अतिउत्साह आणि निष्काळजीपणा इतर वऱ्हाड्यांना भोवला. फुटलेले फटाके अंगावर उडून त्यात तीनजण गंभीररित्या जखमी झाले. तुमसर तालुक्यातील विहीरगाव येथील एका लग्न समारंभात हा धक्कादायक प्रकार घडला. मनोहर तुमसरे (५०) रा. कुलपा, सुभाष खडोदे (५०) रा. नागपूर, उमेश चाणोरे ( ४५ ) सेलोटी, जि. गोंदिया अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. यापैकी मनोहर तुमसरे यांच्यावर तुमसर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे, तर उर्वरित दोघांवर उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

# ग्रामपंचायतीच्या मनमानी विरोधात फुलंब्री येथे एम.आय.एम पक्षाचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव येथील प्रकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापर्यंत दलित वस्तीचा मुख्य रस्ता असुन त्या मुख्य रस्त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कायमस्वरूपी लोखंडी कमान आहे. ती कमान लोकवर्गणीतून बनवण्यात येत आहे, परंतु खामगाव ग्रामपंचायत मधील संबंधित अधिकारी व कर्मचारी विरोध करत आहे. म्हणून या करिता दलित समाजातील नागरिकांच्या वतीने दि.2 मे रोजी फुलंब्री पंचायत समिती कार्यालय समोर खामगाव येथील ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभारा विरोधात उपोषण करण्यात आले.सदरील या कामासाठी ग्रामपंचायत मध्ये अर्ज दाखल करण्यात आला होता.तरी पण ग्रामपंचायत मधील लोक जातीवादी चा विचार ठेवत कमानी ला विरोध करत आहे.

संबंधित सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. तरी पण या ग्रामपंचायतीच्या कारभारा विरोधात चौकशी करावे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या स्मारकाला परवानगी देण्यात यावी अशी मागणी समस्त नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.या आमरण उपोषणाला ए



आय एम आय एम पक्षाचे फुलंब्री शहराध्यक्ष भगवान गंगावणे , सुदाम पवार , मिलिंद म्हस्के , सत्यम म्हस्के , विष्णू म्हस्के ,किरण म्हस्के, कचरु म्हस्के , गयाबाई म्हस्के, विठ्ठल म्हस्के ,कडुबा म्हस्के राहुल म्हस्के , सोनाली म्हस्के, शोभा म्हस्के , भिमराव म्हस्के , नितीन म्हस्के, चंद्रकला म्हस्के , देविदास म्हस्के , पार्वती म्हस्के , संदीप म्हस्के कविता म्हस्के यांच्या सह अनेक नागरिकांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# आंबेडकरी समाजाचे प्रश्न सोडविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवाडी संघर्ष समितीच्या वतीने दि. ०२/०५/२०२३ रोजी समाजाच्या मुलभूत व न्यायिक प्रश्नांसाठी जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात आले असून पुढील मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. यावेळी जिल्हाधिकारी अस्तिककुमार पांडे यांनी त्यांच्या अधिकार कक्षेतील प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. सदरील धरणे आंदोलनाचे नेतृत्व समितीचे अध्यक्ष मा. श्रावणदादा गायकवाड यांनी केले.

**प्रमुख मागण्या-**

१ ) शासन निर्णयानुसार औरंगाबाद शहरामधील शासन घोषित झोपडपट्टीवासियांना तात्काळ पी. आर. कार्ड ( मालकी हक्क ) देण्यात यावे.

२ ) शासकीय गायरान व सरकारी जमीनीवरील भूमीहीन मागासवर्गीयांचे १४ एप्रिल २०२३ पर्यंतचे अतिक्रमण कायम करण्यात यावे. तसेच, मा. सर्वोच्च न्यालालयाच्या निकालाविरुध्द वटहुकूम काढण्यात यावा किंवा पुनर्विचार याचिका दाखल करण्यात यावी.

३ ) मा. मुंबई उच्च न्यायालयाने गायरान व सरकारी जमीनीवरील शेती व निवासाकरीता केलेले अतिक्रमण काढणेबाबतच्या दिलेल्या निकालाविरुध्द शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करण्यात यावी.

४ ) सरकारी व गायरान जमीनीवरील अतिक्रमण धारकास दिलेल्या नोटीसा तात्काळ मागे घेण्यात याव्यात. ५ ) मागासवर्गीयांचे विविध मंडळामार्फत देण्यात आलेले दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंतचे थकबाकी कर्ज विनाअट माफ करण्यात यावे.

६ ) शासकीय कर्ज योजने अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे कर्ज मंजूर व वाटप करण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँक व्यवस्थापकाविरुध्द अॅट्रॉसिटी अॅक्ट व मानसिक त्रास दिल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात यावा.

७ ) विविध शासकीय कर्ज योजने अंतर्गत प्राप्त कर्ज प्रस्ताव ०३ महिन्याच्या आत निकाली काढण्याचे बँक व्यवस्थापनास आदेशित करावे.

८ )शासकीय कर्ज योजने अंतर्गत मंजूर व वाटपाचे अधिकार बँक मॅनेजर यांनाच पुर्वीप्रमाणे देण्यात यावे.

९ ) शासकीय कर्ज योजनेतर्गत सिबीलची अट रद्द करा.

१० ) अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अत्याचार पिडिताच्या खात्यावर तात्काळ अनुदान जमा करण्यात यावे. ११ ) जिल्हयातील नगरपरिषद, नगर पंचायत अंतर्गत रमाई आवास योजनेचे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ बैठक घेवून मंजुर करण्यात यावे.

यावेळी नानासाहेब शिंदे, वसंतराज वक्ते, मोहनलाल गोरमे,, मनिष नरवडे, संतोष मोकळे, अशोक गरुड, प्रा. दिपक खिल्लारे, बाळू वाघमारे, राहुल वडमारे, पवन पवार, मधुकर त्रिभुवन, भाई एस एस जमधडे, उत्तम जाधव, सुरेश गायकवाड, नायबराव दाभाडे, अंबादास रगडे, सुरेश खाडवे, बलराज दाभाडे, संजय म्हस्के, ज्ञानेश्वर खंदारे, भिमराव गाडेकर, फकीरचंद अवचरमल, मुकुंद दाभाडे, नवल सुर्यवंशी, अंकुश शिंदे, कचरु गवळी, भाई प्रकाश जाधव, संजय जाटवे, शांतीलाल लसगरे, भगवान तरटे, सुरेश कटारे, लाला बथाडे, संतोष गांगवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजय मोरे, राजु म्हस्के, अमोल भालेराव, सुरज मगरे, रोहीदास जाधव, राजेश राठोड, अशोक सोनवणे, सर्जेराव भुईगड, कांतीलाल सोनवणे, पुष्पानंद नितनवरे, रावसाहेब हिवराळे, किशोर ससाणे, सचिन गायकवाड, विशाल गवळे, ज्ञानेश्वर खरात, रवि बोर्डे, गौतम गवई, बाबासाहेब सुरडकर, प्रविण बोर्डे, जगदीश बिरसणे, भिक्कन दामोधर, सुमित खंडागळे, संजय मिसाळ, संतोष त्रिभुवन, महेंद्र घुले, संदिप तांगडे, अक्षय जीनवाल, विशाल मोरे, अमोल खरात, कृष्णा पडूळकर, दिपक केदारे, सुनिल सोळस, नितीन दाभाडे, शैलेश झाल्टे, कुणाल गायकवाड, संतोष ससाणे, विजय जाधव, करुणाताई पाईकडे, अंतिकाबाई देहाडे, शबुबाई डोंगरे, तान्हाबाई डोंगरे, तुळसाबाई पडूळकर, गिता पडूळकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ. प्रशांत बंब यांच्याकडून नुकसानग्रस्त पिकांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यामध्ये गेल्या 3 दिवसापासून सातत्याने अवकाळी पाऊस गारा व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची आज आ. प्रशांत बंब यांनी पाहणी केली. यामध्ये मका बाजरी बिजवाई कांदे आंबा चिकू फळबागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून आमदार प्रशांत बंब यांनी शेतकरी प्रभाकर वरपे यांच्या शेतात पिक पाहणी करून तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेशीत करण्यात आले तसेच खुलताबाद तालुक्यात विविध गावात पीक पाहणी करण्यात आली. यावेळी उपस्थित भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे , एल जी. गायकवाड, शहर अध्यक्ष सतिश दांडेकर, नवनाथ बारगळ, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड नगरसेवक परसराम बारगळ, योगेश बारगळ, दिनेश अंभोरे, संदिप निकम, अविनाश वेताळ, किशोर भावसार, उमेश आवारे, संतोष घुसिंगे, राहुल हजारे द्वारकादास घोडके, द्वारकादास जाधव, आदींची उपस्थिती होती.



# लाच घेताना वाहतूक शाखा कर्मचारी जाळ्यात

## तक्रारदाराला ऑनलाइन पावती फाडण्याची धमकी भोवली

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** उमेश दिनकर सूर्यवंशी , पोलीस हेडकॉन्टेबल, शहर वाहतुक शाखा , धुळे यांनी तक्रारदार यांचेकडुन २०० / -रु लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वतः स्विकारतांना ए.सी.बी च्या जाळ्यात तक्रारदार हे चाळीसंगांव येथील रहीवाशी असुन त्यांचे मोटारसायकलवर धुळे येथे नेहमी येणे जाणे असते . धुळे शहरात मोटारसायकल ने प्रवास करतांना त्यांना तहसिल चौकात तसेच जुर्दु हायस्कुल जवळ ड्युटीस असलेले ट्राफिक पोलीस त्यांना विनाकारण अडवुन त्यांचे कडे डायव्हिंग लायन्सस असतांना देखील या ना त्या कारणाने त्यांच्या कडे २०० ते ५०० रूपांयाची मागणी करून त्यांच्या मागणी प्रमाणे पैसे दिले नाही तर टाफिक पोलीस त्यांना जावु देत नाही व त्यांचे वाहनांवर मोठ्या रक्कमेचा ऑनलाईन दंड आकारण्याचे सांगत असत तक्रारदार यांना तेथे ड्युटीस असलेल्या टाफिक पोलीसांचा नेहमीचा व पैसे वसुलीचा त्रास होत असलल्याने त्यांनी धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दि .०२.०५.२०२३ रोजी सदर लाच मागणीच्या बाबत तकार दिली होती.

तकारदार यांनी दिलेल्या तकारीची आज दि ०३.०५.२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान धुळे शहरात जुना आग्रा रोड लगत अॅग्लो जुर्दू हायस्कुल समोरील रस्त्यावर पोलीस हेड कॉन्स्टेबल उमेश दिनकर सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांना थांबवुन त्यांचे कडे वाहनांवर ऑनलाईन दंड नको असेल तर २०० / - रुपये दयावे लागतील अशी २०० / -रू लाचेची मागणी करून सदर २०० / - रुपये लाचेची रक्कम स्वत : साठी धुळे शहरातील अॅग्लो उर्दु हायस्कुल समोरील रस्त्यावर स्विकारतांना त्यांना आज रोजी रंगेहात पकडण्यात आले असुन यांचे विरूध्द धुळे शहर पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे . सदरची कारवाई पोलीस उप अधीक्षक अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मंजितसिंग चव्हाण, पोलीस निरीक्षक प्रकाश झोडगे तसेच राजन कदम, शरद काटके, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर करत आहेत.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर